**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

अधिवेशनाचा शुभारंभ “वंदे मारतम्” या गीताच्या समूह गायनाने झाला.

**पृ.शी./मु.शी. :** भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन कार्यावर तयार केलेला चित्रपट चित्रपटगृहात प्रदर्शित होत असल्याबाबतची घोषणा

**सभापती :** भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन कार्यावर आधारित डॉ.जब्बार पटेल दिग्दर्शित “डॉ.बाबासाहेब आंबेडकर” हा चित्रपट आज दिनांक ५ डिसेंबर, २०१६ रोजी सायंकाळी ६.०० वाजता नागपूर येथील स्मृती चित्रपटगृहात प्रदर्शित करण्यात येणार आहे. सर्व सन्माननीय सदस्यांनी या चित्रपटास उपस्थित रहावे. या बाबतच्या प्रवेशपत्रिका सदस्यांना टपाल खणाद्वारे वितरित करण्यात आलेल्या आहेत.

----------

....२.....

## नियम २८९ अन्वयेच्या सूचनेसंबंधी

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, आम्ही म.वि.प. नियम २८९ अन्वये एक महिन्यापूर्वी केंद्र शासनाने घेतलेल्या ५०० व १००० रुपयांच्या नोटाबंदीच्या संदर्भात राज्यातील जनतेवर झालेल्या परिणामाच्या संदर्भात सूचना दिली आहे.

सभापती महोदय, एक महिन्यापूर्वी देशाच्या सन्माननीय पंतप्रधानांनी ५०० आणि १०००रुपयांच्या नोटाबंदीचा निर्णय जाहीर केला.

**सभापती** : माननीय विरोधी पक्षनेते नियम २८९ अन्वये दिलेल्या सूचनेसंबंधी बोलत आहेत. या संदर्भातील सदस्यांनी दिलेली सूचना मी अगोदर वाचतो. माझ्याकडे एकूण दोन सूचना आलेल्या आहेत.

आज दिनांक ५ डिसेंबर, २०१६ रोजी सकाळी ९.०७ वाजता व १०.४५ वाजता सर्वश्री धनंजय मुंडे, शरद रणपिसे, सुनील तटकरे, नारायण राणे, जयंत पाटील, हेमंत टकले, संजय दत्त, अमरसिंह पंडित, अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स. यांनी केंद्र शासनाने एक महिन्यापूर्वी घेतलेल्या ५०० व १००० रुपयांच्या नोटा बंदीच्या निर्णयामुळे राज्यातील जनतेचे अतोनात हाल होत असल्याबाबत नियम २८९ अन्वये सभागृहाचे सर्व कामकाज स्थगित करण्याबाबतची सूचना दिली आहे. माननीय संसदीय कार्यमंत्र्यांना मी सांगू इच्छितो की, या विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन फार तांत्रिक बाबीमध्ये न जाता संबंधित माननीय सदस्यांना बोलू द्यावे. माननीय सदस्यांनी त्यांचे विचार मांडताना वेळेचे भान ठेवले पाहिजे. आपल्या नेहमीच्या प्रथा आणि परंपरेप्रमाणे प्रत्येक पक्षातील एका सदस्याने बोलावे अशी माझी सूचना आहे.

श्री.गिरीश बापट : सभापती महोदय, आपली सूचना मान्य आहे. माननीय विरोधी पक्षनेत्यांना महत्वाचा विषय मांडावयाचा आहे. या सभागृहात नेहमीच राज्यातील महत्वाच्या विषयावर चर्चा होत असते. त्यामुळे आपण मांडलेली सूचना मान्य आहे. परंतु आजच्या कामकाज पत्रिकेमध्ये दर्शविल्याप्रमाणे सभागृहाच्या पटलावर ठेवावयाचे जे कामकाज आहे ते देखील

श्री.गिरीश बापट......

मान्य आहे. परंतु आजच्या कामकाज पत्रिकेमध्ये दर्शविल्याप्रमाणे सभागृहाच्या पटलावर ठेवावयाचे जे कामकाज आहे ते देखील पाहिजे एवढीच माझी विनंती आहे.

श्री.नारायण राणे : सभापती महोदय, आपण नियम २८९ अन्वयेच्या सूचनेचा उल्लेख केला आहे. नियम २८९ अन्वये मांडलेल्या सूचनेबाबत माननीय विरोधी पक्षनेत्यांनी त्यांची भूमिका मांडण्यास सुरुवात केली होती. आज संपूर्ण देशात नोटाबंदीशिवाय दुसरा कोणताही महत्वाचा विषय चर्चेत नाही. संपूर्ण देशाच्या आणि महाराष्ट्राच्या जनतेशी निगडित असा हा विषय असून यामध्ये सरकारचा संबंध येतो. संपूर्ण देशातील जनता हवालदिल झाली आहे, त्रस्त झाली आहे. या विषयामुळे देशात आतापर्यंत जवळजवळ ७० लोक मृत्युमुखी पडलेले आहेत. अन्य कामकाज असेल तर अधिवेशनाचा कालावधी वाढविता येईल. परंतु या विषयावर प्राधान्याने चर्चा होणे आवश्यक आहे. इतर कामकाजाचा विषय आता चर्चेला घेता येणार नाही.

**सभापती :** लेईंगबाबत मी निर्णय घेईन.

श्री.नारायण राणे : आता नको.

**सभापती** : माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.नारायणराव राणे यांना मी सांगू इच्छितो की, माननीय विरोधी पक्षनेते यांना मी बोलण्याची परवानगी दिली होती, त्यांना थोडक्यात भूमिका मांडू द्यावी. याबाबत माननीय संसदीय कार्यमंत्री श्री.गिरीश बापट यांनी देखील विचार मांडले आहेत. अधिक चर्चा न करता विरोधी पक्षनेत्यांनी त्यांचे विचार मांडावेत.

श्री.गिरीश बापट : सभापती महोदय, आपली सूचना मान्य आहे.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, देशाच्या माननीय पंतप्रधानांनी दिनांक ८ नोव्हेंबर, २०१६ रोजी चलनातील ५०० व १००० रुपयाच्या नोटा रद्द करण्याचा निर्णय जाहीर केला. ज्या दिवशी हा निर्णय जाहीर करण्यात आला त्यावेळी तीन

श्री.धनंजय मुंडे....

हेतू स्पष्ट करण्यात आले होते. या देशातील काळा पैसा मोठया प्रमाणात बाहेर काढण्यात येईल व भ्रष्टाचार थांबविण्यात येईल. दुसरा हेतू असा होता की शेजारील राष्ट्राकडून दहशतवाद्यांचा वापर करण्यासाठी मोठया प्रमाणात ५०० व १००० रुपयांच्या फेक नोटांचा वापर करण्यात येतो तो थांबण्यास मदत होईल. भारतीय चलनात जवळजवळ १५ टक्के खोटया नोटा असल्याचा अंदाज वर्तविण्यात आला होता. देशवासियांना माननीय पंतप्रधानांनी त्यांच्या या निर्णयामागील हेतू सांगितले. जवळजवळ १२५ कोटी जनतेने हा निर्णय ऐकला.

दिनांक ९ नोव्हेंबर, २०१६ पासून देशातील बँकांच्या एटीएम मशिन्ससमोर, बँकांच्या शाखांमध्ये व टपाल कार्यालयांमध्ये नोटा बदलून घेण्यासाठी लोकांच्या रांगा सुरु झाल्या. या निर्णयाचा परिणाम काय होणार आहे याची त्या क्षणाला कोणालाही माहिति नव्हती. देशाच्या पंतप्रधानांनी घेतलेल्या निर्णयाच्या हेतूबद्दल आम्हाला आरोप करावयाचा नाही. आज महाराष्ट्रामध्ये या निर्णयाचा जो परिणाम झाला आहे त्याची चर्चा या सभागृहात होणे आवश्यक आहे.मी या ठिकाणी जाणीवपूर्वक सांगू इच्छितो की, या नोटाबंदीच्या निर्णयामुळे राज्यातील शेतकरी, शेतमजूर, छोटे व्यापारी यांचे १५ ते २० हजार कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे. दिनांक ८ नोव्हेंबर, २०१६ नंतर आतापर्यंत या निर्णयामुळे देशात किती काळा पैसा बाहेर आला हे जाहीर करण्यात यावे. राष्ट्रीयकृत बँकांमध्ये किती प्रमाणात काळा पैसा जमा करण्यात आला आहे हे जनतेला कळले पाहिजे. बँकांच्या शाखांबाहेर लागलेल्या रांगांमध्ये एकही काळा पैसेवाला उभा असल्याचे दिसून आले नाही. रांगांमध्ये सामान्य शेतकरी, शेतमजूर, छोटे व्यापारी, दररोज रोखीने व्यवहार करणारे उभे असतात. माननीय पंतप्रधानांनी घेतलेल्या या ५०० व १००० रुपयांच्या नोटाबंदीच्या निर्णयाने सामान्य माणसाला अडचणीत टाकले आहे. ज्या दिवशी हा निर्णय जाहीर केला तेव्हा सांगण्यात आले की, या निर्णयामुळे देशातील भ्रष्टाचार बंद होणार आहे, काळा पैसा उजेडात येणार आहे.

श्री.धनंजय मुंडे...........

आज केंद्र सरकारकडून भ्रष्टाचाराबाबत काही बोलले जात नाही. काळा पैसा किती जमा झाला याबाबत काही जाहीर केले जात नाही. असे सांगितले जाते की, आम्हाला संपूर्ण देश कॅशलेस करावयाचा आहे. ख-या अर्थाने तुम्हाला देशाचा आर्थिक कारभार कॅशलेस करावयाचा आहे, म्हणूनच हा निर्णय घेतला गेला असा संशय सर्वसामान्य जनतेच्या मनात आहे. देशात दिनांक ८ नोव्हेंबर, २०१६ रोजी ५०० व १००० रुपयांच्या नोटा चलनातून बाद करण्याचा निर्णय जाहीर करण्यात आला. दिनांक ९ नोव्हेंबर, २०१६ रोजी देशातील सर्वाधिक खपाच्या मोठया वृत्तपत्रांमध्ये पेटीएम संदर्भात जाहिरात देण्यात आली. आम्ही काही प्रमुख वृत्तपत्रांच्या प्रतिनिधींशी चर्चा केली. टाईम्स ऑफ इंडिया, इंडियन एक्स्प्रेस ही देशातील सर्वाधिक खपाची वृत्तपत्रे आहेत. अशा मोठया वृत्तपत्रांच्या ९ तारखेच्या वृत्तपत्र प्रकाशनामध्ये जाहिरात द्यावयाची असेल तर ती किमान ४ दिवस अगोदर ती त्यांच्याकडे द्यावी लागते, त्यापोटी द्यावयाची रक्कम त्यांच्याकडे भरणा करावी लागते. ५०० व १००० च्या नोटा बंद करण्याचा निर्णय दिनांक ८ नोव्हेंबर, २०१६ रोजी घोषित केल्यानंतर लगेच दिनांक ९ नोव्हेंबर, २०१६ रोजी या प्रमुख वृत्तपत्रांमध्ये पेटीएम संदर्भात जाहिरात देण्यात आल्याबद्दल जनतेच्या मनामध्ये संशय निर्माण झाला आहे.

या नंतर श्री. ओटवणेकर

श्री.धनंजय मुंडे......

केंद्र शासनाच्या एका निर्णयामुळे ७० जणांना रांगेत उभे रहावे लागल्यामुळे प्राण गमवावे लागले आहेत त्यामुळे आम्ही हा प्रश्न उपस्थित करीत आहोत. पंतप्रधान देशातील सर्वोच्च पदावर बसले आहेत. तेथे बसल्यानंतर देखील काळा पैसा कोणाकडे आहे हे आपल्याला माहीत नसेल तर ती दुर्दैवी गोष्ट आहे. आज देशातील १२५ कोटी जनतेला स्वत:च्या पैशासाठी बँकांच्या रांगेमध्ये उभे केले आहे. असे असताना आपण सांगत आहात की, देश बदलतो आहे. कदाचित देश बदलेलही. देशातील, राज्यातील शेतकऱ्याचे, शेतमजुराचे पोट हे हातावर आहे. त्याने रोज कमविल्यानंतरच त्याच्या घरातील चूल पेटते. परंतु, या निर्णयामुळे त्यांच्या घरातील चुलीवर परिणाम झाला. त्याच्या पोटावर परिणाम झाला. शेतमजुराला शेतकऱ्याने पैसे कसे द्यायचे हे आज सरकारने सांगावे. शेत खुरपायला माय-माऊली शेतामध्ये येतात. त्या माय-माऊलींना आम्ही कार्ड स्वॅप करून पैसे द्यायचे काय ? या राज्यात हजारो-लाखो गवंडी कामगार आहेत. ते रोज इमारतींचे काम करीत आहेत. त्यांना देखील दर आठवड्याला रोखीने पेमेंट दिले जाते. आता त्या गवंडीसाठी स्वॅप मशीन ठेवायचे की पेटीएमचे अकौंट ठेवायचे ? त्यांना पैसे कसे द्यायचे ? आजही लोक मरत आहे. देशाच्या माननीय पंतप्रधानांनी निर्णय जाहीर केल्यानंतर लोकांनी १ महिना सर्व काही सहन केले. पण या निर्णयामुळे राज्यातील व्यापारी, शेतकरी, शेतमजुरांचे २० हजार कोटी रूपयांचे नुकसान झालेले आहे. ते कसे झाले हे देखील मी आपल्याला सांगतो. आता बाजारात सोयाबीनचे पीक आले आहे. प्रत्येक मार्केट कमिटीच्या दारात सोयाबीन आहे.असे असताना कुठलाही व्यापारी सोयाबीन खरेदी करण्यास तयार नाही. जो खरेदी करावयास तयार आहे तो पड्या भावाने शेतकऱ्यांचे सोयाबीन खरेदी करीत आहे. शासनाचा हमी भाव २७०० रूपये असताना आज प्रति क्विंटल २४०० रूपये इतका भाव सोयाबीनला मिळत असेल तर शेतकऱ्याचे नगदी रूपये ४००/- इतके

श्री.धनंजय मुंडे......

प्रति क्विंटल नुकसान होत आहे. त्या शेतकऱ्याला ही नुकसान भरपाई कोण देणार आहे. आज कापसाचा भाव रूपये ३५०० हजार प्रति क्विंटल आहे. ....(अडथळा)....

**सभापती :** माननीय मंत्र्यांनी खाली बसून बोलू नये.

श्री.अमरसिंह पंडित : माननीय सभापती महोदय, सन्माननीय मंत्री बसून बोलत आहेत.

श्री.सुधीर मुनगंटीवार : सभापती महोदय, कोणीही बसून बोलल्यानंतर ते रेकॉर्डवर येत नाही असे आपले संकेत आहेत. गॅलरी ही अदृश्य असते. त्यामुळे कोणीही बसून बोलल्यानंतर वक्त्यांनी त्याकडे लक्ष देऊ नये.

**सभापती :** सन्माननीय सदस्य बसून बोलणार असतील तर ते त्यांचे म्हणणे देखील अदृश्य करून टाकावे.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, सन्माननीय मंत्री श्री.गिरीष महाजन यांनी कापसाला प्रति क्विंटल ३५०० रूपये भाव कुठे दिला जातो असे सांगितले. त्यांनी पूर्वी कापसाला प्रति क्विंटल रूपये ७०००/- इतका भाव मिळावा यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आत्मदहन करण्याचा इशारा दिला होता ही बाब त्यांना आठवत असेल. सत्तेवर आल्यानंतर ते ही गाेष्ट विसरले आहेत. आज वस्तुस्थिती अशी आहे की, शेतकऱ्यांचा कापूस हा पड्या भावाने म्हणजे रूपये ३५००/- या दराने घेतला जात आहे. आज ते मंत्री झाले आहेत. त्यामुळे खाली काय चालले आहे........

**सभापती :** माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी मुद्यावर बोलावे.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, कापसाच्या बाबतीत देखील तेच आहे. आज विदर्भामध्ये अधिवेशन होत आहे. नोटाबंदीनिर्णयाच्या अगोदर मोसंबीला रूपये ५००००/- इतका भाव होता. संत्र्याला रूपये ३५०००/- इतका भाव होता. आज संत्र्याचा भाव रूपये १५०००/- वर आलेला आहे. यात शेतकऱ्यांचे नुकसान नाही

श्री.धनंजय मुंडे ......

काय ? आज मोसंबीचा भाव रूपये ३५०००/- पर्यंत आला आहे. प्रत्येकी रूपये १५०००/- इतके शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे. अशा प्रकारे कांदा उत्पादक शेतकरी, धान उत्पादन शेतकरी यांचे नुकसान होत आहे. एवढेच नव्हे तर सामान्यातील सामान्य शेतकरी, फळभाजी विकणारा यांच्यावर देखील परिणाम झालेला आहे. नोटाबंदीचा निर्णयाचा आपला उद्देश चांगला असेल..... आपण म्हणत आहात की, काळा पैसेवाल्यांचा काळा पैसा आमच्या बँकेत जमा झाला आहे. त्यामुळे आमची मागणी आहे की, नुकसान झालेल्या शेतकरी, शेतमजुरांना, छोट्या व्यापाऱ्यांसाठी १५ ते २० हजार कोटींचे छोटे पॅकेज जाहीर करावे. असे जाहीर करण्यास आपल्याला कोणतही अडचण आहे ? आपण ६५ उद्योगपतींचे NPA अकौंट रि-शेडुल्डकरीत आहात. ज्या बँका अडचणीत आलेल्या आहेत त्यासाठी आपण हा निर्णय घेतलेला आहे. हा आजच्या चर्चेचा विषय आहे. आपल्याला चलन बंदी करावयाची होती. त्यामुळे आपण निर्णय घेतला. आपण

कमीत कमी रूपये २०००/- आणि रूपये ५००/- इतक्या मूल्याचे चलन बाजारात येण्यासाठी पुरवठा करणे आवश्यक होते. एक महिला पैसे काढण्यासाठी गेली असता रांगेतच तिची डिलिव्हरी व्हावी या शिवाय दुसरे दुर्दैव काहीच असू शकत नाही. तरूणातील तरूण गेला. म्हातारातील म्हातारा गेला. शेतकरी गेला, शेतमजूर गेला. छोटा व्यपारी गेला. त्यांनी आपली जीवनयात्रा रांगेतच संपविली. असे असताना आपण या निर्णयाचे समर्थन करीत आहात. आपण बँकेत मुबलक पैसे उपलब्ध करून दिले असते व ते सामान्य माणासाला मिळाले असते तर आम्ही देखील समर्थन केले असते. आम्ही देखील या गोष्टीचे समर्थ केले असते. सभापती महोदय, मला येथे दोन गोष्टी सांगावयाच्यचा आहेत. आज बी-बियाणे घेण्यासाठी शेतकरी दुकानावर जातो तेव्हा दुकानावर जुन्या नोटा घेतल्या जात नाहीत. जुन्या कुठल्याही नोटा घेतल्या जात नाही. हा विषय गंभीर आहे. यात जवळ जवळ ७० जणांचा जीव गेलेला आहे.

श्री.धनंजय मुंडे ......

महाराष्ट्रातील असंख्य शेतकरी, शेतमजूर आणि शेकडो छोट्या व्यापाऱ्यांचे नुकसान झाले आहे.  त्यामुळे या विषयावर नियम २८९ अन्वये चर्चा होणे आवश्यक आहे.  तेव्हा मी आपल्याला विनंती करतो की, नियम २८९ अन्वये चर्चा करण्यास अनुमती द्यावी.

श्री.नारायण राणे : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.धनंजय मुंडे यांनी नियम २८९ अन्वयेच्या माध्यमातून सभागृहासमोरील सर्व कामकाज स्थगित करून एका महत्वाच्या विषयावर चर्चा करण्यासंबंधातील प्रस्ताव मांडला आहे. या माध्यमातून सदर चर्चा का घ्यावी यासंबंधातील आपले भाष्य त्यांनी केले आहे. मी देखील आजचे सर्व कामकाज बाजूला ठेवून प्राधान्याने सदर विषयावर चर्चा करावी हे सांगण्यासाठी उभा आहे.

सभापती महोदय, दिनांक ८ नोव्हेंबर २०१६ रोजी सायंकाळी देशाचे माननीय पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदी यांनी आपले भाषण करत असताना त्यांनी रूपये ५००/- आणि रूपये १०००/- च्या नोटा रद्द करण्याचा राष्ट्रीय निर्णय जाहीर केला. त्यांनी आपल्या भाषणात सांगितले की, आज रात्रौ १२.०० वाजल्यानंतर रूपये ५०० आणि रूपये १०००/- च्या नोटा कागज का तुकडा होणार आहेत. मा.पंतप्रधानांचे हे वाक्य आहे. खरे म्हणजे हिंदू संस्कृतीमध्ये, भारतीय संस्कृतीमध्ये नोटा, पैसे यांना लक्ष्मी मानले जाते. लक्ष्मी पूजनाच्या दिवशी नोटा, पैसे यांचे पूजन करण्यात येते. ते चलन रात्रौ १२.०० नंतर कागज का तुकडा झाला. त्याऐवजी त्यांनी काळा पैसा, भ्रष्टाचारी पैसा असा शब्द वापरला असता तर समजू शकलो असतो. असो. मला त्याबद्दल भाष्य करावयाचे नाही. तो निर्णय झाल्यानंतर आजमितीपर्यंत देशातील परिस्थितीत कोणतीही सुधारणा झालेली नाही. मग त्यात गरीब असो, मध्यमवर्गीय असो, उद्योजक असो, शेतकरी असो, व्यापारी असो. कामगार असो, भिकारी असो, फेरीवाला असो यांच्या परिस्थितीत कोणत्याकही प्रकारची सुधारणा झालेली नाही. याला अपवाद फक्त ठरावित उद्योजकच आहेत. काही ठराविक उद्योजक सोडले तर सर्वजण या निर्णयामुळे दु:खी आहेत. असे असताना या सरकार मधील मंत्री म्हणतील की, श्री.मोदी साहेबांनी सांगितले की, ९४ टक्के लोकांचा आम्हाला पाठिंबा आहे. हे देखील संशयास्पद आहे. ते ही खरे नाही. महाराष्ट्राचा विचार करून वास्तवादी उल्लेख माननीय विरोधी पक्षनेते श्री.धनंजय मुंडे यांनी केला आहे. या राज्यातील प्रमुख घटक शेतकरी आहे. आपल्या विकासाचा केंद्रबिंदू शेतकरी

श्री.नारायण राणे ......

आहे. तो आज हवालदिल आहे. आता रब्बीचा हंगाम सुरू आहे. पण खिशात पैसे नाही. जुन्या नोटा आहेत. पण त्या चालत नाही. त्यामुळे बी-बियाणे मिळत नाही. आज शेतकऱ्यांकडे पैसे नाहीत. एल अँड टी सारख्या मोठ्या कंपनीने १४ हजार कामगारांना कामावरून काढून टाकले आहे.

या नंतर श्री. जुन्नरे

श्री.नारायण राणे......

५०० आणि १००० रुपयांच्या नोटा रद्द झाल्यामुळे कामगार,मजूर,उद्योजक यांच्याकडे आज पैसे राहीले नाहीत. नोटा बंदीचा निर्णय घेण्यापूर्वी सरकारने यासंदर्भात दुसरी काही तरी व्यवस्था करावयास पाहिजे होती, या निर्णयाच्या संदर्भात सरकारने अगोदर काही तरी जाणीव जनतेला करुन द्यावयास पाहिजे होती. काळा पैसा आणि भ्रष्टाचार रोखण्यासाठी सरकारकडे अनेक मार्ग आहेत.

सभापती महोदय, नोटा बंदीच्यासंदर्भात या अगोदर जवळपास ६ देशांनी प्रयत्न केले होते. नोटा बंदीचा प्रयत्न करणारे ६ देश असून ते अतिशय लहान देश आहेत. या देशांनी नोटा बंदीचा निर्णय घेतल्यानंतर हे देश दिवाळख◌ा◌ोरीत गेले. नोट बंदीनंतर एकही देश यशस्वी झालेला नाही, प्रगती करु शकलेला नाही. ज्या देशांनी नोट बंदीचा प्रयत्न केला होता ते देश एवढे छोटे आहेत की, त्यांची नावे सुध्दा कोणाला माहिती नाहीत.

आज आपला देश महासत्तेकडे वाटचाल करीत आहे,अमेरिका,चीन यांच्या बरोबर जाण्याचा प्रयत्न करीत आहे. परंतु नोट बंदीचा निर्णय घेत असताना आपल्या देशातील जो कर दाता आहे, गरीब जनता आहे, शेतकरी आहे, शेतमजूर आहे, उद्योजक आहे, व्यापारी आहे आज तूयांचे सर्व व्यवहार थंडावले आहेत. असे असताना आम्हाला जनतेचा पाठिंबा आहे असे आपण कसे काय म्हणू शकता ? तुम्हाला ९४ टक्के जनतेचा पाठिंबा आहे असे म्हणून स्वत:च्या हाताने तुम्ही पाठ थोपटून घेत आहात. परंतु ते वास्तववादी चित्र नाही. एक हप्त्यापूर्वी नगरपालिकांचे निकाल लागले आहेत. या सभागृहात मला नगरपालिकेच्या विजयासंदर्भात अभिनंदनाचे बॅनर्स दिसले होते. नगरपालिकेत आपल्याला चांगले यश मिळाल्याबद्दल आम्ही आपले अभिनंदन करतो. भाजपाला नंबर वन यश मिळाले आहे. महाराष्ट्र गुन्हयात सुध्दा नंबर वन आहे. खरे म्हणजे याबद्दलही आपले अभिनंदन करावयास पाहिजे.

श्री.नारायण राणे......

सभापती महोदय, आज देशातील आणि महाराष्ट्रातील शेतकरी हवालदिल झालेला असल्यामुळे त्याचेही अभिनंदन करावयास पाहिजे. अच्छे दिन आले, महागाई कमी झाली असे मला कोठेही दिसलेले नाही. मला असे वाटते की, अच्छे दिन व वाढती महागाई या विषयाकडे जनतेचे लक्ष जाऊ नये म्हणून सरकारने ५०० आणि १००० रुपयांच्या नोटा रद्द करण्याचा निर्णय घेतलेला दिसतो. नोटा बंदीमुळे संपूर्ण देशातील जनता चिंताग्रस्त झालेली आहे. आज जनतेला त्यांचेच पैसे काढता येत नाही अशी परिस्थिती या सरकारने करुन ठेवली आहे. एकदा सांगता की, तुम्हाला चार हजार रुपये काढता येईल, दुसऱ्यांदा सांगता की, तुम्हाला अडीच हजार रुपयेच काढता येईल, तिसऱ्यांदा सांगता की, तुम्हाला अडीच लाखच काढता येईल. जनतेचे पैसे असतानाही जनतेला त्यांचे पैसे बँकेतून काढता येत नाही.

सभापती महोदय, परवा पंजाब राज्यात मन हेलावून टाकणारी घटना घडलेली आहे. मुलीचे लग्न असल्यामुळे अडीच लाख रुपये काढण्यासाठी एक पंजाबी माणूस बँकेच्या रांगेत उभा राहिला. साडेतीन-चार तास रांगेत उभा राहून पैसे मिळण्यापूर्वीच त्याला हृदय विकाराचा झटका आला आणि तो माणूस मृत्यू पावला. आपलेच पैसे काढण्यासाठी हा माणूस बँकेत गेला असताना त्याचा मृत्यू झाल्यामुळे मुलीचे लग्न त्यामुळे बाजूलाच राहिले. असे असताना हे सरकार नंबर वन, नोट बंदीला ९४ टक्के जनतेचा पाठिंबा म्हणून आनंदोत्सव साजरे करीत आहे. नोट बंदीच्या संदर्भात यांचेच मंत्री ख◌ा◌ाजगीमध्ये नाराजी व्यक्त करीत असतात. कोणालाही ओपन बोलण्याचे धाडस राहिलेले नाही. जनता त्रस्त झाली तरी चालेल परंतु आपले पद सुरक्षित राहिले पाहिजे असे त्यांना वाटते. वैयक्तिक स्वार्थ साधण्याचेच काम सुर आहे.

सभापती महोदय, या पूर्वी देशात अनेक पंतप्रधान झाले,सरकारे आली तेव्हाही जनता हेच प्रगतीचे माध्यम ठरले होते आणि जनतेसाठीच काम केले जात होते.

श्री.नारायण राणे ......

परंतु नोट बंदीच्या निर्णयामुळे जनता हवालदिल झालेली आहे. हमालाने माल दुसरीकडे पोहचवला तर त्याला तुम्ही कार्ड देणार आहात काय,बूट पॉलिश केली तर त्याला तुम्ही कार्ड देणार आहात काय,भिकाऱ्याला पैसे म्हणून तुम्ही कार्ड देणार आहात काय ? आज जनता हवादिल आणि त्रस्त झालेली आहे. जनतेकडे पैसे असताना सुध्दा जनतेला जेवण करता येत नाही. भ्रष्टाचार आणि काळा पैसा सरकार म्हणून तुमच्याकडे कमी पडला आहे काय ?

सभापती महोदय, राज्यसभेतील माजी मा.पंतप्रधान श्री. मनमोहन सिंग यांचे भाषण तुम्ही ऐकलेच असेल. त्यांनी आपल्या भाषणात दोन महत्वाचे मुद्दे मांडले होते. नोट बंदीमुळे देशाला पैसे मिळतील, देश आर्थिक सबळ होईल,आर्थिक स्वातंतत्र्य वगैरे वगैर... त्यानी पुढे सांगितले की, नोट बंदीच्या निर्णयामुळे देशाच्या जीडीपीचे दोन टक्क्याने घसरण होईल. दोन टक्के म्हणजे जवळपास ३ लक्ष कोटी रुपये. त्यांनी पुढे सांगितले की, नोट बंदीचा निर्णय म्हणजे जनतेचे शोषण असून तेच आता सर्वत्र होत आहे. निवडणुकीपूर्वी तुम्ही जी आश्वासने दिली होती ती पूर्ण होऊ शकत नाही.

सभापती महोदय, निवडणुकीच्या वेळी औरंगाबाद येथे आरएसएसची बैठक होती त्यासाठी मा.मुख्यमंत्री साहेब बैठकीसाठी गेले होते. त्यावेळेस त्यांनी लोकांसमोर सांगितले होते की, आमची विकासाची व्याख्या वेगळी असून आम्ही शाश्वत
विकास करणार आहोत. पंरतु मला अजून पर्यंत शाश्वत विकास दिसला नाही. शाश्वत विकास कसा असतो याचे स्पष्टीकरण सरकारने केले तर बरे होईल.

(सभापती महोदयांनी वेळेच्या संदर्भात बेल वाजवल्यानंतर)

साहेब, बेल पेक्षा हे महत्वाचे आहे. मला मेहरबानी नको आहे, नाही तर मी बसतो. मी हे माझ्यासाठी बोलत नाही.शाश्वत विकास,आर्थिक स्वातंत्र्य असे नवीन नवीन शब्द......

श्री.सुधीर मुनगंटीवार : सभापती महोदय, नियम २८९ चा मुद्दा कसा होऊ शकतो यासंदर्भात समोरुन भाषण केले जात असेल तर त्यावर मी सुध्दा एक तास उत्तर देऊ शकतो.

श्री.नारायण राणे : आपण दोन तास उत्तर द्या, आमची ऐकण्याची तयारी आहे.

श्री.सुधीर मुनगंटीवार : सभापती महोदय, बाल सुलभ प्रश्नाला मी बाल सुलभ उत्तर देईन.

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी उच्चारलेला शब्द मागे घ्यावा.

**सभापती :** जे ठरले होते त्या प्रमाणे कामकाज सुरु आहे. सन्माननीय सदस्यांनी कृपया खाली बसावे. मंत्री महोदय, तुम्ही माझ्याकडे बघून बोला. आपण ज्येष्ठ मंत्री आहात, कृपया माझ्याकडे बघून बोलावे.

श्री.सुधीर मुनगंटीवार : सभापती महोदय, मी माझे शब्द मागे घेतो. परंतु या विषयाचे गांभीर्य जपले पाहिजे.

श्री.गिरीश बापट : सभापती महोदय, नियम २८९ चा मुद्दा कसा होऊ शकतो यांसदर्भात मा.विरोधी पक्ष नेत्यांनी विचार मांडले असून आता मा.श्री.नारायण राणे साहेब, हा विषय नियम २८९ चा कसा होतो यासंदर्भात विचार मांडत आहेत.

आमचा त्याला विरोध नाही. परंतु हा विषय सभागृहात सविस्तरपणे चर्चेला येणारच आहे. तसेच आपण मधून मधून सदस्यांना निर्देश करीत आहात. त्यामुळे आपल्या निर्देशाचा आदर राखला गेला पाहिजे. यासंदर्भात मा.मंत्री श्री.मुनंगटीवार साहेब आपले विचार मांडणार आहेत. जेव्हा चर्चा होईल तेव्हा या विषयावर सन्माननीय सदस्यांनी सविस्तरपणे आपले विचार मांडावेत. आपण सन्माननीय सदस्यांना थोडक्यात मुद्दे मांडण्यासंदर्भात निर्देश द्यावेत अशी विनंती आहे.

श्री.सुधीर मुनगंटीवार : सभापती महोदय, हा विषय नियम २८९ चा कसा होऊ शकतो एवढया पुरतेच सन्माननीय सदस्यांनी सांगावे.

**सभापती :** मंत्री महोदय, मी आपल्याला दुसऱ्यांदा सांगत आहे की, तुम्ही सदस्यांकडे बघून बोलण्यापेक्षा माझ्याकडे बघून बोलावे. माझा चेहरा एवढा वाईट नाही.

श्री.नारायण राणे : सभापती महोदय, माझ्या पेक्षा मा.अर्थमंत्र्यांना २८९ मुद्दा चांगला समजतो व मला त्याची जाणीव आहे. हा विषय नियम २८९ मध्ये बसत नसल्यामुळे आज चर्चा होणार नाही असे म्हटले गेल्यामुळे मी हा विषय नियम २८९ च्या प्रस्तावात कसा बसतो हे सांगण्यासाठी उभा राहिलो. नोट बंदीमुळे जनतेचे हाल होत आहेत. त्यामुळे हा विषय नियम २८९ कसा होत नाही हे मला शिकवण्याची गरज नाही.

श्री.सुधीर मुनगंटीवार : सभापती महोदय, आम्ही सुध्दा जनतेच्या मतावर निवडून येतो.

श्री.नारायण राणे : मा.अर्थमंत्र्यांचे असे का होते हे मला समजत नाही. मंत्री महोदयांनी नंतर उत्तर द्यावे.

**सभापती :** कोणीच कोणाला शिकवू नये. सगळयांनी मिळून मला शिकवावे.

श्री.नारायण राणे : नोट बंदीच्या निर्णयासंदर्भात उत्तर देण्यापूर्वी मा.मंत्री महोदयांनी आयबी,सीबीआय,सीआयडी यांच्याकडून जनतेचे नेमके काय म्हणणे आहे, या निर्णयावर जनता काय म्हणते, जनता समाधानी आहे की, नाही याची माहिती घ्यावी. वाटले तर आपण सरकारी कर्मचारी/अधिकाऱ्यांकडूनही यासंदर्भात माहिती घ्यावी. तुम्ही जनतेला सुखसोयी कशा दिल्या, किती एटीएम बंद आहेत, बँकेत गेलो तर बँक मॅनेजर सांगतो की, बँकेतील पैसे संपले आहेत. त्यामुळे यासंदर्भातील वस्तुस्थिती आम्हाला सांगावी.

या नंतर श्री. शिगम

श्री.नारायण राणे....

मी माननीय वित्त मंत्र्यांचे खालच्या सभागृहातील भाषण ऐकले आहे. त्यांनी भाषणात कोणत्या प्रकारच्या उपाययोजना सुचविल्या आहेत ?

सभापती महोदय, लोक बँकेत पैसे काढण्यासाठी जातात परंतु बँकेत पैसे कुठे आहेत ? बँकेत पैसे नाहीत म्हणून रांगेतील लोक रागावतील म्हणून बँक मॅनेजर बँकेस टाळे लावून घरी जात आहे. आपल्याकडे अेटीएम मशीन्स किती आहेत ? माननीय मंत्र्यांनी या सर्व विषयांचा चांगला अभ्यास करुन उत्तर द्यावे.

सभापती महोदय, आम्ही येथे कामकाज करण्यासाठी आलो आहोत. आम्ही शासकीय कामकाज करुन देणार आहोत. परंतु ते कामकाज असेच व्हावे, तसेच व्हावे, असे कोणी सांगत असेल तर ते आम्हाला बंधनकारक नाही. सभागृहातील नियम सर्वांना सारखेच आहेत. आम्ही नियमांचे पालन करतो. जोपर्यंत सलोख्याने, चांगल्या वातावरणात संसदीय कामकाज होणार असेल तर त्यास आमचा पाठिंबा आहे. परंतु असेच कामकाज झाले पाहिजे, तसेच कामकाज झाले पाहिजे, असे आपण म्हणत असाल तर तसे होणार नाही. आम्ही नियम २८९ अन्वये दिलेल्या सूचनेच्या अनुषंगाने सरकार चर्चा करण्यास सुरुवात करणार असेल तर त्या चर्चेस आमची तयारी आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, नियम २८९ अन्वये कामकाजपत्रिकेतील सर्व कामकाज बाजूला ठेवून ५०० व १००० रुपयांच्या नोटा बंदी या विषयावर चर्चा झाली पाहिजे, अशी माझी मागणी आहे. हा विषय २८९ चा होऊ शकत नाही याची मला जाणीव आहे. परंतु आपण "खास बाब" म्हणून त्यावर विचार मांडण्यास परवानगी दिलेली आहे.

**सभापती :** मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छिताे की, अपवाद म्हणून मी परवानगी दिलेली आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : हा विषय नियम २८९ चा कसा होतो यावरच मी बोलणार आहे. या विषयाच्या अनुषंगाने माननीय विरोधी पक्ष नेते, ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री.नारायण राणे यांनी आपले मते मांडली. त्यांनी मांडलेल्या मुद्यांची पुनरावृत्ती मी करणार नाही.

सभापती महोदय, राज्यातील ११ कोटी जनतेपैकी ६ कोटी जनता ही सहकाराशी संबंधित आहे. आज राज्यातील सर्व जिल्हा मध्यवर्ती बँका पूर्णपणे बंद आहेत. जिल्हा मध्यवर्ती बँका चोर आहेत असे राज्यकर्ते बोलू लागले आहेत. त्याबाबत मला सरकारला असे विचारावयाचे आहे की, जिल्हा मध्यवर्ती बँकेशी निगडीत असलेली राज्यातील ६ कोटी जनता वेडी आहे काय ? दिनांक ८ नोव्हेंबर, २०१६ रोजी रात्री ८.०० च्या सुमारास माननीय पंतप्रधानांनी ५०० व १००० रुपयांच्या नोटा बंदी संदर्भात घोषणा केली. त्यानंतर केवळ दोन दिवस जिल्हा मध्यवर्ती बँकेत पैसे आले. आता जिल्हा मध्यवर्ती बँकेत एक रुपया देखील येत नाही. त्यामुळे ग्रामीण भागातील अर्थव्यवस्था पूर्णपणे ठप्प झालेली आहे. माननीय सहकार मंत्री येथे उपस्थित आहेत. माननीय सहकार मंत्री पूर्वीपासून सहकार क्षेत्रात काम करीत आहेत. ते आता सहकार मंत्री झाले आहेत. हा विषय केंद्र शासनाच्या अखत्यारितील आहे, राज्य शासनाच्या अखत्यारितील नाही हे मला माहीत आहे. परंतु या विषयावर येथे चर्चा झाली पाहिजे.

सभापती महोदय, राष्ट्रीयकृत बँकेतील काही कर्मचाऱ्यांनी नोटा देताना गैरव्यवहार केला म्हणून त्यांना निलंबित करण्यात आले. एका तरी सहकारी बँकेत असा प्रकार झाला आहे काय ? सहकार खात्यामध्ये केवायसी नॉर्म्स राबविले
जातात. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांची केवायसी पारदर्शक आहे. असे असताना आपण त्यांना चोर बोलत आहात हे योग्य नाही असे मला वाटते.

मध्यवर्ती बँकांमध्ये जो पैसा आलेला आहे तो ठेवायचा कुठे असा प्रश्न निर्माण झालेला आहे. आम्ही त्याचा विमा देखील उतरु शकत नाही अशी परिस्थिती आहे. या विषयावर चर्चा होईल त्यावेळी मी सविस्तर बोलेन.

श्री.जयंत प्र.पाटील....

सभापती महोदय, माझा मूळ व्यवसाय प्रिटींगचा आहे. मी प्रिंटींग प्रेस चालवून इतर व्यवसाय वाढविला आहे. प्रिटींग मशीनची क्षमता किती आहे, त्यावर किती वेळा प्रिंट करु शकतो याची सर्व माहिती माझ्याकडे आहे. माझी आपणास विनंती आहे की, आपण आजच या विषयावर चर्चा करण्यास परवानगी द्यावी कारण राज्यातील गोरगरीब जनतेस कळेल की, हे सभागृह त्यांच्या अडचणीची दखल घेत आहे. आपण या संदर्भात आजच निर्णय देऊ शकत नाही, परंतु आपण सरकारला निर्देश देऊ शकता की, जिल्हा मध्यवर्ती बँकेचा कारभार सुरु करण्यासाठी नियमानुसार कोणत्या प्रकारच्या उपाययोजना करता येतील ते पहावे. आपण या विषयावरील चर्चेस परवानगी देणार द्याल किंवा नाही, परंतु मी केलेली सूचना आपण मान्य करावी, अशी माझी आपणास विनंती आहे.

श्री.सुधीर मुनगंटीवार : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी एक महत्त्वाचा विषय स्थगन प्रस्तावाच्या चौकटीत बसत नसताना उपस्थित करुन त्या विषयाकडे सरकारचे लक्ष वेधले त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. हे खरे आहे की, या निर्णयाची अंमलबजावणी करताना काही त्रुटी व समस्या निर्माण झालेल्या आहेत. कारण इतका मोठा देश हिताचा निर्णय घेतल्यानंतर बँकांमध्ये नोटांचा तुटवडा असणे, टंचाई असणे, लोकांना रांगेत उभे रहावे लागले, अशा ज्या बाबी माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी मांडल्या त्याच्याशी मी सहमत आहे.

सभापती महोदय, या गोष्टीचे राजकारण किंवा राजकीय भांडवल करु नये अशी माझी अपेक्षा आहे. हा भावनेचा प्रश्न नाही. काळ्या पैशाच्या बाबतीत आणि भ्रष्टाचार संपविण्यासाठी केंद्र सरकारने जो गोवर्धन पर्वत उचललेला आहे त्यास आपण सर्वांनी मदत करण्याचा प्रश्न आहे. या विषयावर चर्चा करण्यास सरकारची तयारी आहे. आपणास ही चर्चा नियम २८९ अन्वये करता येणार नाही. कारण त्यावर काही बंधने आहेत. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी इतर आयुधांचा वापर करुन ही चर्चा उपस्थित करावी. त्यांच्या मनात काही प्रश्न आहेत. माझ्या असे लक्षात आले आहे की, त्यांच्यापर्यंत परिपूर्ण माहिती पोहोचलेली नाही. जसे की, त्यांनी सांगितले की, नोटा बदलताना कमी नोटा येत आहेत. रोज साधारणत: १३ हजार ५०० ते १४ हजार कोटींच्या नोटा बाजारात येत आहेत. मग या नोटा बाहेर का येत नाही याचा विचार केला पाहिजे म्हणून नवनवीन गोष्टी केल्या जात आहेत. माननीय विरोध पक्ष नेत्यांनी सांगितले की, या सरकारने उद्योगपतींचे कर्ज माफ केले. सन २००१ ते २०१३ पर्यंतच्या कालावधीत तत्कालीन सरकारने उद्योगपतींना किती सूट दिली त्याची माहिती माझ्याकडे आहे. माननीय विरोधी पक्ष नेत्यांपर्यंत ती माहिती पोहोचलेली नाही म्हणून त्यांनी पत्रकारांना सांगितले की, " ये सरकार किसानों के साथ नहीं है. ये सरकार उद्योगपतियों के साथ है इसलिए सरकार उद्योगपतियों का कर्ज माफ करती है." तत्कालीन सरकारने उद्योगपतींची २ लाख ४ हजार ५४९ कोटी रुपयांची कर्जे माफ केली आणि शेतकऱ्यांचे फक्त ७३

श्री.सुधीर मुनगंटीवार....

हजार कोटी रुपये माफ केले.

सभापती महोदय, ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री.नारायण राणे हे उद्योगमंत्री होते. राज्यातील उद्योग वाढावेत यादृष्टीने ते योजना करीत होते,उद्योग पॉलिसी करीत होते. परंतु आता ते उद्योग विरोधी का बोलत आहेत, हे मला समजत नाही. राज्यात उद्योग वाढले पाहिजेत, रोजगार वाढला पाहिजे, शेतीमध्ये रोजगार मिळाला पाहिजे अशी व्यवस्था आपणास निर्माण करायची आहे.

सभापती महोदय, एक हजार आणि पाचशे रुपयांच्या नोटा बंद करण्यात आल्या. देशात असा पहिल्यांदा प्रकार झाला आहे काय ? ज्या सरकारमध्ये महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर मंत्री होते, श्यामाप्रसाद मुखर्जी मंत्री होते त्या सरकारमध्ये पंडित जवाहरलाल नेहरु यांनी पाच हजार आणि दहा हजार रुपयांच्या नोटा बंद केल्या होत्या. सन १९७८ मध्ये दहा हजार, पाच हजार, हजार रुपयांच्या नोटा बंद केल्या होत्या. तत्कालीन सरकारने सन २०१४ मध्ये पाचशे रुपयांच्या नोटा बंद केल्या आणि सन २००५ पूर्वीच्या नोटा बदलून दिल्या. तेव्हा हा काही नवीन निर्णय आहे काय ? सन १९९८ ते २००० मध्ये सर्व युरोप समूह एक झाला. त्यांच्या सर्व नोटा बंद होऊन युरो चलन आले. मागील चार वर्षापूर्वी ऑस्ट्रेलियाने त्यांचे चलन बंद केले. अमेरिका दर दहा वर्षांनी असे प्रयोग करते. अनेकांनी सांगितले की, या नोटा समांतर अर्थव्यवस्था निर्माण करीत आहेत. सन १९९९ मध्ये जागतिक बँकेने २०.७ टक्के आणि सन २००७ मध्ये २३.०७ टक्के समांतर अर्थव्यवस्था असल्याचे सांगितले. आतंकवाद, ड्रगमाफिया व इतर अनेक गोष्टींतून हा निर्णय घेण्यात आलेला आहे. या निर्णयामुळे १६ प्रकारचे आजार कमी होण्याची शक्यता आहे. एखादा माणूस आजारी असेल आणि त्याने एक गोळी घेतल्यावर त्याचा आजार बरा झाला असे होत नाही. कारण त्याला आठ-दहा दिवसांचा कोर्स करावा लागतो. अर्थव्यवस्था सशक्त आणि मजबूत करण्यासाठी असे चांगले निर्णय घ्यावे लागतात.

श्री.सुधीर मुनगंटीवार.....

सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी शेतकऱ्यांची होत असलेली अडचण सांगितली ती खरी आहे. आपण शेतकऱ्यांच्या दृष्टीकोनातून सांगत आहात, परंतु मी महाराष्ट्रातील जनतेला आणि शेतकऱ्यांना मानाचा मुजरा करतो कारण त्यांनी ही व्यवस्था आत्मसात करीत व्यवहार करण्याचा प्रयत्न केला. सरकार म्हणून मी त्यांना अभिवादन करताना त्यांना सपोर्टींग अशी भूमिका घेत आहोत.

या नंतर श्री. बोर्डे

श्री.सुधीर मुनगंटीवार....

भामरागड आणि सिरोंचामध्ये आवश्यकता असेल तर राज्य सरकारने स्वत: आरबीआयला सांगितले की, त्या ठिकाणी हेलिकॉप्टरने नोटा पोहचविण्यासाठी आम्ही वाहनांसह सर्व व्यवस्था करीत आहोत. हे खरे आहे की, काही ठिकाणी शेतकऱ्यांच्या गावापर्यंत नोटा पोहचविण्यासाठी एटीएम बरोबरच मायक्रो एटीएम ची व्यवस्था करण्यास सांगितले आहे. या शिवाय मोबाईल बँकांची व्यवस्था सुध्दा करीत आहोत. मी मागच्या सरकारला धन्यवाद देईल. कारण मागच्या सरकारने एक निर्णय घेतला, परंतु तो त्यांच्या लक्षात आला नाही की, भविष्यात त्या निर्णयाचा फायदा होईल. तो निर्णय असा होता की, निराधार योजनेचे अनुदान थेट लाभार्थ्यांच्या खात्यात जमा करण्यात येते, शेतकऱ्यांचे पैसे सुध्दा थेट त्यांच्या खात्यात जमा करण्यात येतात. परंतु आता आपण नवीन.....

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, माननीय मंत्री या चर्चेला उत्तर देत आहेत काय ?

**सभापती** : मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देतो की, माननीय अर्थमंत्र्यांनी थोडेसे शासनाच्या बाजूने बोलावे हे ठरलेले आहे.

श्री.सुधीर मुनगंटीवार : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, मी या विषयावरील चर्चेला उत्तर देत नाही. मी केवळ एक महत्त्वाचा विषय सभागृहाच्या निदर्शनास आणून देऊन.....

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे.
आम्ही उपस्थित केलेला विषय नियम २८९ मध्ये कसा बसतो हे सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले आहे. सभापती महोदय, आम्ही दिलेल्या नियम २८९ च्या सूचनेला आपण अनुमती दिल्यानंतर या विषयावर चर्चा सुरु होईल. आम्ही २८९ ची सूचना मांडल्यानंतर त्यावर सरकारच्या वतीने जर उत्तर येत असेल तर त्यास आमची हरकत नाही.

श्री.धनंजय मुंडे......

जर सरकारकडून आम्ही उपस्थित केलेल्या सूचनेच्या अनुषंगाने उत्तर येत असेल तर विरोधी पक्षाच्या अधिकारानुसार आम्हाला राईट टु रिप्लायची संधी मिळावयास पाहिजे, अशी आमची विनंती आहे.

श्री.सुधीर मुनगंटीवार : सभापती महोदय, मी सन्माननीय सभागृहाच्या निदर्शनास आणून देतो की, मी या विषयावरील चर्चेला उत्तर देत नाही. परंतु एक महत्त्वाचा विषय मला सभागृहाच्या निदर्शनास आणून द्यावयाचा आहे. ज्या विषयाची जाणीव सरकारला आहे तो विषय मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देतो.

सभापती महोदय, सहकारी बँकांच्या संदर्भात माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी उल्लेख केला. मुळात सहकारी बँकांच्या संदर्भात सरकारची भूमिका स्पष्ट आहे. या विषयी माननीय मुख्यमंत्र्यांनी स्वत:हून एकदा नव्हे तर दोनदा माननीय केंद्रीय अर्थ मंत्री श्री.अरुण जेटली यांच्या बरोबर चर्चा केली आहे. सहकारी बँकांना सुध्दा नोटा बदलून देण्यापासून ते नवीन नोटा देण्यापर्यंतची परवानगी द्यावी, या बाबत विनंती केली आहे. माननीय विरोधी पक्ष नेते श्री.धनंजय मुंडे आणि सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी प्रश्न उपस्थित केला. येत्या दोन-तीन दिवसात माननीय मुख्यमंत्र्यांसमवेत आम्ही पुन्हा या विषयाच्या अनुषंगाने केंद्रीयअर्थ मंत्री महोदयांना भेटण्यासाठी जाणार आहोत. मुळात ही संपूर्ण परिस्थिती उत्तर प्रदेशातील काही बँकांमुळे निर्माण झाली आहे. आम्ही हा प्रयत्न करीत आहोत की, या सर्व प्रकरणात सहजपणा, सुलभता यावी आणि शेतकऱ्यांच्या संदर्भात जे प्रश्न निर्माण झाले आहेत ते सरकार म्हणून सकारात्मक भूमिकेतून सोडविले गेले पाहिजेत.

सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते आणि इतर सन्माननीय सदस्यांना मी विनंती करु इच्छितो की, या निर्णयाच्या अनुषंगाने जे प्रश्न उपस्थित होत आहेत ते सोडविण्यासाठी आपल्या जर काही अनमोल सूचना असतील तर त्या द्याव्यात.

श्री.सुधीर मुनगंटीवार........

आपल्या सूचना केवळ चर्चेतूनच नव्हे तर, जेव्हा जेव्हा तुम्हाला वाटेल तेव्हा तेव्हा साधी चिठ्ठी पाठवून अमुक प्रश्नावर सरकारने उत्तर शोधले पाहिजे असे सांगितले आणि तो प्रश्न योग्य असेल तर सरकार तो प्रश्न सोडविण्यासाठी पूर्णपणे मदत करेल. या निर्णयाच्या अनुषंगाने जे जे प्रश्न उपस्थित झालेले आहेत ते सोडविण्यासाठी सरकार प्रयत्न करीत आहे. काही काही ठिकाणी मात्र तांत्रिक अडचणी आहेत. परंतु.....

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय,....

**सभापती** : मी सन्मानीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आपले असे ठरले होते की, नियम २८९ अन्वये दिलेली सूचना तांत्रिकदृष्ट्या निकषात बसते की नाही यावर चर्चा करावी. मी असेही सांगितले होते की, या सूचनेच्या अनुषंगाने बोलताना कोणीही आज तांत्रिक मुद्दे उपस्थित करु नयेत.

हा विषय नियम २८९ च्या निकषात कसा बसत नाही हे मला सांगावयाचे आहे. त्यानंतर मला स्वत:ला शासनाला जे काही निर्देश द्यावयाचे आहेत ते मी देईन.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी या ठिकाणी कर्ज माफीच्या बाबतीत सांगितले. अगोदरच्या सरकारने चुकीची कर्जमाफी दिली, चुकीचा कारभार केला म्हणून जनतेने तुम्हाला सत्तेवर बसविले. विजय मल्ल्या हा आर्थिक घोटाळे करुन फरार झाला आहे. त्याचे ८ हजार कोटी रुपये एसबीआयने माफ केले आहेत. त्यामुळे....

श्री.सुधीर मुनगंटीवार : सभापती महोदय, मला वाटते या सभागृहात घटनेने दिलेल्या अधिकारांचा अशा पध्दतीने उपयोग करता कामा नये. अशा पध्दतीने लोकांचे सामान्य ज्ञान बिघडविण्याचा प्रयत्न सन्माननीय सदस्यांच्या हातून होता कामा नये.

**सभापती** : मी आता नियम २८९ अन्वये दिलेल्या सूचनेच्या अनुषंगाने माझा निर्णय देत आहे.

महाराष्ट्र विधानपरिषद नियमांतील एखादा नियम स्थगित करणे या संबंधीचा नियम २८९ हा आहे.

कोणत्याही सदस्यास माननीय सभापतींच्या अनुमतीनेकोणताही नियम स्थगित करण्यासंदर्भात सूचना देता येईल. यावरुन असे दिसून येते की, प्रश्नोत्तराचा तास किंवा इतर सगळे कामकाज स्थगित करण्यासाठी त्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात असे काम किंवा असा एखादा विशिष्ट प्रस्ताव सभागृहासमोर असणे आवश्यक आहे. परंतु आज अधिवेशनाचा पहिलाच दिवस असल्यामुळे आजच्या दिवशी म.वि.प. नियम २८९ चे प्रस्ताव विचारात घेतले जात नाहीत.

**सभापती** : तसेच आजच्या कामकाजपत्रिकेवर शोक प्रस्ताव व कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे, या व्यतिरिक्त इतर कोणतेही शासकीय कामकाज दर्शविण्यात आलेले नाही. मी निदर्शनास आणून देतो की, सदरहू विषयावर लक्षवेधी सूचना प्राप्त असून, ती कार्यवाहीत आहे. आज दिलेल ी नियम २८९ ची सदरहू सूचना आजच्या कामकाजपत्रिकेत समाविष्ट नसल्यामुळे मी ही सूचना नाकारीत करीत आहे. तथापि, मी माननीय मंत्री श्री.चंद्रकांत पाटील यांना सांगू इच्छितो की, आताच माननीय अर्थ मंत्री श्री.सुधीर मुनगंटीवार यांनी जे विचार मांडले त्या नुसार सहकारी बँकांमध्ये व्यवहार करण्यास परवानगी मिळण्यासाठी माननीय मुख्यमंत्री, ज्येष्ठ मंत्री महोदय हे केंद्रीय अर्थमंत्र्यांची भेट घेणार आहेत. विशेष करुन सहकारी बँकेच्या जिल्हा मध्यवर्ती बँका आणि राज्य सहकारी बँकेत व्यवहार करण्यास परवानगी मिळण्याबाबत ही भेट घेण्यात येणार आहे. माझी सूचना राहील की, विरोधी पक्षातील जे मान्यवर सहकार बँकांशी संबंधित आहेत त्यांना सुध्दा केंद्रीय अर्थमंत्र्यांच्या भेटीच्या वेळी सोबत घेऊन जावे. माझ्या मते

**सभापती**....

माननीय श्री.शरद पवार साहेबांनी अशा प्रकारचा प्रयत्न केला होता. त्या बाबतीत काय झाले मला माहीत नाही. आपली बैठक झाल्यानंतर माननीय मुख्यमंत्री आणि जिल्हा बँकेचे काही सदस्य यांची माझ्या दालनात बैठक घेण्यात येईल.

आपल्या राज्याच्या सहकारी बँकेचे जे महत्त्वाचे निर्णय आपल्याला घ्यायचे आहेत आणि कळवायचे आहेत या बाबत आपण कार्यवाही करावी.(गोंधळ)....

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, आपण निर्णय दिलेला आहे. काही नोटा चलनातून बाद केल्यामुळे नवीन नोटा मिळविण्यासाठी ७० लोकांना आपला जीव गमवावा लागला आहे. या निर्णयामुळे राज्यातील जनतेचे २० हजार कोटी रुपयांचेनुकसान झाले आहे. तरी सुध्दा या सभागृहात चर्चा होत नसेल तर.....हा विषय गंभीर आहे....

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात.)

**सभापती** : मी निर्णयाप्रत आलेलो आहे. आजच्या कामकाजपत्रिकेतील अनुक्रमांक-एक व दोन ही बाब पुढे ढकलण्यात येत आहे. आता अनुक्रमांक-तीन वरील सन २०१६-२०१७ च्या पुरवणी मागण्या सादर करण्यात येतील.

(विरोधी पक्षाचे काही सदस्य घोषणा देतात.)

**पृ.शी./मु.शी.** : सन २०१६-२०१७ करिता खर्चाचे पुरवणी विवरणपत्र सादर करणे

श्री.दीपक केसरकर ( अर्थ राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन २०१६-२०१७ करिता खर्चाचे पुरवणी विवरणपत्र सभागृहाला सादर करीत आहे आणि तसे करीत असताना मी आपल्या निदर्शनास आणू इच्छितो की, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २०५ आणि २०३ (३) मधील तरतुदीस अनुलक्षून मिळालेल्या अधिकारानुसार महाराष्ट्राचे राज्यपाल यांनी सन २०१६-२०१७ च्या खर्चाच्या पुरवणी विवरणपत्रावर चर्चा करण्याकरिता सभागृहाला शिफारस केली आहे.

**सभापती** : सन २०१६-२०१७ मधील खर्चाचे पुरवणी विवरणपत्र सभागृहाला सादर झाले आहे.

सदरहू पुरवणी मागण्यांच्या विवरणपत्राच्या प्रती सदस्यांसाठी राखून ठेवलेल्या टपाल खणाद्वारे वितरित करण्यात येत आहेत.

(विरोधी पक्षाचे काही सदस्य घोषणा देतच असतात.)

**पृ.शी./मु.शी.** : सन २००९-२०१०, २०१०-२०११ व २०११-२०१२ या वर्षाच्या अतिरिक्त खर्चाचे विवरणपत्र सादर करणे

श्री.दीपक केसरकर ( अर्थ राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन २००९-२०१०, २०१०-२०११ व २०११-२०१२ या वर्षाच्या अतिरिक्त खर्चाचे विवरणपत्र सभागृहाला सादर करीत आहे आणि तसे करीत असताना मी आपल्या निदर्शनास आणू इच्छितो की, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २०५ आणि २०३ (३) मधील तरतुदीस अनुलक्षून मिळालेल्या अधिकारानुसार महाराष्ट्राचे राज्यपाल यांनी सन २००९-२०१०, २०१०-२०११ व २०११-२०१२ या वर्षाच्या अतिरिक्त खर्चाच्या विवरणपत्रावर चर्चा करण्याकरिता सभागृहाला शिफारस केली आहे.

**सभापती** : सन २००९-२०१०, २०१०-२०११ व २०११-२०१२ या वर्षाच्या अतिरिक्त खर्चाचे विवरणपत्र सभागृहाला सादर झाले आहे.

सदरहू पुरवणी मागण्यांच्या विवरणपत्राच्या प्रती सदस्यांसाठी राखून ठेवलेल्या टपाल खणाद्वारे वितरित करण्यात येत आहेत.

(विरोधी पक्षाचे काही सदस्य घोषणा देतच असतात.)

सभागृहातील गोंधळसदृश परिस्थितीत मला सभागृहाचे कामकाज पार पाडणे शक्य होत नसल्यामुळे मी सभागृहाची बैठक १५ मिनिटांसाठी स्थगित करतो.

(सभागृहाची बैठक दुपारी १२.४९ ते १.०४ वाजेपर्यंत स्थगित झाली.)

यानंतर श्री बोर्डे

या नंतर श्री. कांबळे

**(स्थगितीनंतर)**
**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

**पृ.शी.** : शोक प्रस्ताव
**मु.शी.** : श्री. केवलचंद कन्हैय्यालाल जैन, माजी वि.प.स.
व माजी राज्यमंत्री, सर्वश्री बाबुराव नरसिंगराव कोकाटे-आडसकर, आनंदीराम मोदीराम कुमठ, माजी वि.प.स. यांच्या निधनाबद्दल शोक प्रस्ताव

श्री. चंद्रकांत पाटील (महसूल मंत्री) : सभापती महोदय, मी श्री. केवलचंद कन्हैय्यालाल जैन, माजी वि.प.स. व माजी राज्यमंत्री, सर्वश्री बाबुराव नरसिंगराव कोकाटे-आडसकर, आनंदीराम मोदीराम कुमठ, माजी वि.प.स. यांच्या निधनाबद्दल मी खालील शोक प्रस्ताव मांडतो.

"श्री. केवलचंद कन्हैय्यालाल जैन, माजी वि.प.स. व माजी राज्यमंत्री, सर्वश्री बाबुराव नरसिंगराव कोकाटे-आडसकर, आनंदीराम मोदीराम कुमठ, माजी वि.प.स. यांच्या दु:खद निधनाबद्दल हे सभागृह अतीव दु:ख व्यक्त करते."

कै. केवलचंद कन्हैय्यालाल जैन यांचा जन्म दिनांक १९ डिसेंबर, १९२७ रोजी मध्य प्रदेश राज्यातील झाशी जिल्ह्यातील शनीपुरा येथे झाला. त्यांचे शिक्षण मॅट्रीक पर्यंत झाले होते. त्यांनी स्वातंत्र्यसंग्रामात सक्रीय सहभाग घेतला होता. त्यात त्यांना कारावासही झाला होता.

कै. जैन यांनी गोंदिया शिक्षण संस्थेचे अध्यक्ष, गोंदिया जनपद सभेचे उपाध्यक्ष, गोंदिया कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती तसेच महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस म्हणूनही उत्तम कार्य केले होते. भंडारा व गोंदिया जिल्ह्यातील अनेक शैक्षणिक, सामाजिक व सहकारी संस्थांशी त्यांचा निकटचा संबंध होता.

श्री. चंद्रकांत पाटील ....

भंडारा-गोंदिया जिल्ह्यातील आदिवासींच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी विशेष योगदान दिले होते. कै. जैन सन १९८० मध्ये भंडारा स्थानिक प्राधिकारी संस्था मतदारसंघातून महाराष्ट्र विधानपरिषदेवर निर्वाचित झाले होते. ऑक्टोबर, १९८२ ते फेब्रुवारी, १९८३ या काळात नियोजन, दारूबंदी व उत्पादन शुल्क, ऊर्जा, वने, सामाजिक वनीकरण व संसदीय कार्य खात्याचे राज्यमंत्री म्हणून त्यांनी उत्तम कार्य केले होते. अशा या ज्येष्ठ समाजसेवकाचे रविवार, दिनांक २ ऑक्टोबर, २०१६ रोजी दु:खद निधन झाले.

कै. बाबुराव नरसिंगराव कोकाटे-आडसकर यांचा जन्म सन १९२७ मध्ये बीड जिल्ह्यात केज तालुक्यातील मौजे आडस येथे झाला. त्यांचे शिक्षण मॅट्रीक पर्यंत झाले होते.

कै. आडसकर यांनी छत्रपती शिक्षण संस्थेचे संस्थापक, मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष, परभणी कृषी विद्यापीठाचे सदस्य, महाराष्ट्र राज्य कृषी उत्पन्न बाजार समितीचे सदस्य, आंबा सहकारी साखर कारखान्याचे संस्थापक-चेअरमन, बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे संचालक, केज तालुका पंचायत समितीचे सभापती तसेच बीड जिल्हा परिषदेचे सदस्य म्हणूनही त्यांनी उत्तम कार्य केले होते. बीड जिल्ह्यातील अनेक शैक्षणिक, सामाजिक व सहकारी संस्थांशी त्यांचा निकटचा संबंध होता. केज तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी विशेष योगदान दिले होते.

कै. आडसकर सन १९७२ मध्ये बीड जिल्ह्यातील केज मतदारसंघातून तर सन १९७८ मध्ये चौसाळा मतदारसंघातून महाराष्ट्र विधानसभेवर निर्वाचित झाले होते. तसेच सन १९८७ मध्ये उस्मानाबाद-लातूर-बीड स्थानिक प्राधिकारी संस्था मतदारसंघातून महाराष्ट्र विधानपरिषदेवर निर्वाचित झाले होते. एक अभ्यासू लोकप्रतिनिधी अशीच त्यांची प्रतिमा होती. अशा या ज्येष्ठ समाजसेवकाचे शुक्रवार, दिनांक १२ ऑगस्ट, २०१६ रोजी दु:खद निधन झाले.

श्री. चंद्रकांत पाटील.....

कै. आनंदीराम मोदीराम कुमठ यांचा जन्म सन १९३२ मध्ये जळगाव जिल्ह्यातील गुजर पिंपळे येथे झाला. त्यांचे शिक्षण डिप्लोमा इन इंजिनिअरिंग पर्यंत झाले होते. त्यांनी स्वातंत्र्यसंग्रामात सक्रीय सहभाग घेतला होता.

कै. कुमठ यांनी धरणगाव शिक्षण संस्थेचे संस्थापक-अध्यक्ष, धुळे येथील चेंबर ऑफ कॉमर्सचे सदस्य, अखिल भारतीय बिरादरीचे संचालक, भारतीय जैन महामंडळाचे अध्यक्ष, धुळे जिल्हा नियोजन समितीचे सदस्य, महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे सदस्य, धुळे जिल्हा औद्योगिक सहकारी संस्थेचे अध्यक्ष तसेच त्यांनी काँग्रेस सेवादलाच्या महाराष्ट्र शाखेचे प्रमुख म्हणूनही उत्तम कार्य केले हाेते. धुळे जिल्ह्यातील अनेक शैक्षणिक, सामाजिक व सहकारी संस्थांशी त्यांचा निकटचा संबंध होता.

कै. कुमठ सन १९६८ मध्ये महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा महाराष्ट्र विधानपरिषदेवर निर्वाचित झाले होते. एक अभ्यासू लोकप्रतिनिधी अशीच त्यांची प्रतिमा होती.

अशा या ज्येष्ठ समाजसेवकाचे शुक्रवार, दिनांक ३० सप्टेंबर, २०१६ रोजी दु:खद निधन झाले. सभागृह त्या सर्वांच्या कुटुंबीयांच्या दु:खामध्ये सहभागी आहे. त्यांच्या आत्म्यांस शांती लाभो, अशी मी प्रार्थना करतो.

श्री. धनंजय मुंडे (विरोधी पक्ष नेते) : सभापती महोदय, स्वातंत्र्यसेनानी, विधानपरिषदेचे माजी सदस्य, माजी मंत्री श्री. केवलचंद कन्हैय्यालाल जैन, देशाच्या स्वातंत्र्यलढ्यातील थोर सेनानी, माजी राज्यमंत्री, आदरणीय श्री. केवलचंद जैन यांचे अलीकडेच दु:खद निधन झाले. मी त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो. आदरणीय श्री. केवलचंद जैन साहेब जुन्या पिढीतील नेते होते, परंतु त्यांचे विचार पुरोगामी व प्रगतीशील होते. सुधारक विचारांचा त्यांच्यावर प्रभाव होता. गेल्या वर्षी गोंदियात सुरू झालेल्या वैद्यकीय महाविद्यालयासाठी देहदान करणारी पहिली व्यक्ती होण्याचा मान त्यांनी पटकाविला. जैन साहेबांनी मृत्यूपूर्वीच देहदानाचा संकल्प केला होता. मृत्यूनंतर त्यांच्या पार्थिवाला शासकीय इतमामात मानवंदना दिल्यानंतर कुटुंबीयांनी त्यांचा देह गोंदिया वैद्यकीय महाविद्यालयास नेऊन दिला.

या नंतर श्री. रोझेकर

श्री.धनंजय मुंडे...........

हा जैन कुटुंबीयांच्या विचारांचा मोठेपणा आहे. आदरणीय श्री.केवलचंद जैन हे एक महान देशभक्त होते. आपल्या विचारांवर व कार्यावर त्यांची गाढ निष्ठा होती. त्यांनी देशाच्या स्वातंत्र्य लढ्यात भाग घेतला होता. सन १९८० ते १९८६ या काळात विधानपरिषदेचे सदस्य म्हणून त्यांनी उल्लेखनीय कामगिरी बजावली होती. या दरम्यान १९८२ ते १९८३ या काळात त्यांनी राज्याच्या मंत्रिमंडळात नियोजन, ऊर्जा, उत्पादन शुल्क व वन राज्यमंत्री म्हणूनही काम केले होते. स्वातंत्र्य संग्राम सैनिक उच्चाधिकार समितीच्या अध्यक्षपदाची जबाबदारी देखील त्यांनी सांभाळली होती.

सभापती महोदय, देशाच्या स्वातंत्र्य लढ्यात त्यांना चार वेळा तुरुंगवास भोगावा लागला होता. पहिल्या वेळी सन १९४१ मध्ये, दुसऱ्या वेळी सन १९४२ मध्ये, तिसऱ्या वेळी सन १९४३ मध्ये आणि चौथ्या वेळी सन १९४५ मध्ये त्यांना तुरुंगवास सोसावा लागला. चार वेळा तुरुंगवास कसा भोगावा लागला, हेही त्यांनी एका मुलाखतीत सांगितले होते. त्या मुलाखतीतील एक गोष्ट मला अजूनही आठवते. ते असे म्हणाले होते की, "सन १९४३ मध्ये भंडाऱ्याचे एक कार्यकर्ते श्री.मोतीलाल लांजेवार यांच्या पत्राला मी पत्र लिहून उत्तर दिले होते. त्या पत्रात स्वातंत्र्य लढ्याचे आंदोलन उग्र असावे, असे आपण लिहिले. त्यामुळे बॉम्ब तयार करण्याची योजना असावी, या संशयावरुन पोलिसांनी मला अटक केली. तसेच, लांजेवार यांचे घर फोडून शोध मोहीमही पोलिसांनी राबविली होती."

सभापती महोदय, कै.केवलचंद जैन यांचे वडील कन्हैयालाल जैन हे सुध्दा काँग्रेसचे कार्यकर्ते होते व त्यांना पुस्तके वाचण्याचा छंद होता. अलाहाबाद येथून त्यावेळी 'चांद' नावाचे वृत्तपत्र निघत असे. या वृत्तपत्राची २०० पानांची 'फाशी' नावाची पुरवणी काढली गेली होती. त्यामध्ये शहिदांची संपूर्ण माहिती होती.

श्री.धनंजय मुंडे...........

भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात सन १९४२ पर्यंत कुणाकुणाला फाशी झाली, याची त्यात माहिती होती. यातून प्रेरणा घेऊन स्वातंत्र्य लढाईत उतरल्याची एक आठवण केवलचंद जैन साहेबांनी एका मुलाखतीत सांगितल्याचे माझ्या आजही स्मरणात आहे.

सभापती महोदय, अलीकडच्या काळात राजकारणात व समाजकारणात त्यागाची भावना संपत चाललेली आहे, अशी स्व.केवलचंद जैन साहेबांना खंत होती. त्यामुळे राजकारणात व समाजकारणात त्यागाची भावना निर्माण करणे, हीच त्यांना खरी श्रध्दांजली ठरेल.

सभापती महोदय, स्व.आनंदीराम मोदीराम कुमठ हे या सभागृहाचे सन्माननीय सदस्य होते. स्वातंत्र्य सेनानी आदरणीय आनंदीराम मोदीराम कुमठ यांचे सप्टेंबर महिन्यात दु:खद निधन झाले. मी त्यांनाही भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो.

सभापती महोदय, स्व.कुमठ साहेबांनी देशाच्या स्वातंत्र्य लढ्यात सहभाग घेतला होता. कृषी, सहकार, व्यापार, उद्योग, शिक्षण व सामाजिक क्षेत्रातील अनेक संस्थांशी त्यांचा संबंध होता. या सर्व क्षेत्रात व धुळे जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासात त्यांचे महत्वाचे योगदान होते.

सभापती महोदय, धुळ्याच्या चेंबर ऑफ कॉमर्सचे सदस्य, अखिल भारतीय बिरादरीचे संचालक, भारतीय जैन महामंडळाचे अध्यक्ष, धुळे जिल्हा नियोजन समितीचे सदस्य, महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे सदस्य, धुळे जिल्हा औद्योगिक संघटनेचे अध्यक्ष, काँग्रेस सेवादल महाराष्ट्र शाखेचे प्रमुख, अशा अनेक महत्वाच्या पदांची जबाबदारी त्यांनी यशस्वीपणे सांभाळली होती. या सर्वच संस्थांना आधार, दिशा व गती देण्यात त्यांनी महत्वपूर्ण भूमिका बजावली होती.

सभापती महोदय, सन १९६८ मध्ये स्व.आनंदीराम कुमठ हे विधानसभा सदस्यांमधून विधानपरिषदेवर निवडून आले होते. अभ्यासू लोकप्रतिनिधी म्हणून

श्री.धनंजय मुंडे...........

त्यांनी आपली ओळख निर्माण केली होती. राज्य विधीमंडळाची गौरवशाली परंपरा कायम ठेवणे, हीच त्यांना श्रध्दांजली ठरणार आहे. मी त्यांना भावपूर्ण आदरांजली अर्पण करतो.

सभापती महोदय, ज्येष्ठ नेते, माजी आमदार आदरणीय बाबुराव नरसिंगराव आडसकर साहेब विधानपरिषदेचे माजी सदस्य होते. त्यांचे केज तालुक्यातील आडस येथे गेल्या ऑगस्ट महिन्यात दु:खद निधन झाले. मी त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो.

सभापती महोदय, आमच्या बीड जिल्हयाच्या राजकारणातील एक कणखर नेता म्हणून त्यांची ओळख होती. राजकारण, समाजकारण, सहकार क्षेत्र, समाज जीवनाच्या विविध क्षेत्रात गेल्या तीन दशकांपासून त्यांची एक प्रकारे हुकुमत होती. सन १९६५ मध्ये केज पंचायत समितीचे सभापती म्हणून त्यांच्या राजकीय कारकिर्दीला सुरुवात झाली.

सभापती महोदय, सेवा सहकारी सोसायटी पासून बाजार समिती, पंचायत समिती, जिल्हा परिषद, सुत गिरण्या, सहकारी साखर कारखाना या संस्थांवर आडसकर साहेबांनी आपले वर्चस्व अनेक वर्ष सिध्द केलेले आहे. त्यांचा लोकसंपर्क एवढा दांडगा होता की, प्राणज्योत मावळेपर्यंत सर्वसामान्य लोकांसोबत, अगदी त्यांच्या पिढीपासून ते आमच्या पिढीपर्यंत किंवा आमच्या पुढील पिढीपर्यंतच्या लोकांबरोबर ते संपर्कात होते.

सभापती महोदय, पिळदार मिश्या असलेल्या अस्सल ग्रामीण ढंगाचे त्यांचे व्यक्तिमत्व होते. त्यांच्या भाषेला ग्रामीण बाज होता. ‘हाबाडा’ या शब्दाच्या निर्मितीचे श्रेय त्यांना जाते. लोक त्यांना ‘हाबाडा फेम’ म्हणूनच ओळखायचे. ‘हाबाडा’ हा शब्द ‘दणका’ या शब्दाला पर्याय म्हणून जिल्ह्यामध्ये प्रसिध्द झाला आणि तो पुढे संबंध राज्यातही प्रसिध्द झाला. ‘हाबाडा’ या शब्दाशिवाय आमच्या

श्री.धनंजय मुंडे...........

बीड जिल्ह्यात निवडणुकीतील भाषण पूर्ण होत नाही. अशी आडसकर साहेबांची ख्याती होती.

सभापती महोदय, बीड जिल्ह्याच्या राजकारणावर स्व.केशरकाकु क्षीरसागर, सुंदररावजी सोळंके, आदरणीय शिवाजीराव दादा पंडित, अशा अनेक महान व्यक्तींनी आपला प्रभाव प्रस्थापित केला होता. त्या काळात त्यांची कोणतीही मोठी संस्था नसताना एका सामान्य शेतकऱ्याच्या पोटी जन्माला येऊन, या महत्वाच्या नेत्यांसोबत जिल्ह्यामध्ये अतिशय प्रभावशाली नेतृत्व म्हणून ते पुढे आले.

सभापती महोदय, राज्य विधीमंडळाच्या इतिहासात अभ्यासू नेता म्हणून ज्यांचा लौकिक आहे, अशा स्व.खासदार बापुसाहेब काळदाते यांच्याविरुध्द बाबुराव आडसकर साहेबांनी केज मतदारसंघातून विधानसभेची निवडणूक लढविली होती. त्यावेळी ती निवडणूक संबंध राज्यभर गाजली. ज्यावेळी बाबुराव आडसकर साहेब काळदाते साहेबांचा पराभव करुन पहिल्यांदा मुंबई येथील विधीमंडळात आले त्यावेळी अन्य अनेक लोकांबरोबरच विधीमंडळाचे सर्व कर्मचारी, अधिकारीही त्यांना पहाण्यासाठी गेटवर आले होते. या इतिहासाचाही उल्लेख या ठिकाणी केला पाहिजे.

सभापती महोदय, राज्य सहकारी बँकेवर सलग २५ वर्षे संचालक म्हणून त्यांनी काम केले. बीड जिल्हा सहकारी बँकेतही २५ वर्ष त्यांची महत्वाची भूमिका राहिली आहे. बँकेच्या माध्यमातून, अंबाजोगाई सहकारी साखर कारखान्याच्या माध्यमातून बीड जिल्ह्याच्या आर्थिक व सामाजिक विकासाला गती देण्याचे काम त्यांनी केले आहे. लातूर, बीड, उस्मानाबाद स्थानिक स्वराज्य संस्थेतून त्यांनी जवळ जवळ १२ वर्षे या सभागृहाचे प्रतिनिधीत्व केले आहे. आदरणीय श्री.शरदचंद्र पवार यांचे अतिशय विश्वासू सहकारी म्हणून आडसकर साहेब ओळखले जातात. आदरणीय

श्री.धनंजय मुंडे...........

स्व.वसंतदादा पाटील यांचे सरकार अल्पमतात आल्यानंतर आदरणीय श्री.शरद पवार जेव्हा मुख्यमंत्री झाले तेव्हा त्यांना बीड जिल्ह्यातील सातही आमदारांनी पाठिंबा दिला होता. त्यावेळी या आमदारांचे नेतृत्व स्वत: आडसकर साहेबांनी केले होते.

सभापती महोदय, मागील काळात अतिशय दु:खद प्रसंग आडसकर साहेबांच्या जीवनात आले. स्व.प्रकाशजी आडसकर आणि स्व.मेघराज आडसकर ही दोन तरुण मुले त्यांच्या डोळ्यासमोर गेली. मेघराजने तर जूनमध्ये आत्महत्या केली. त्यामधून आडसकर साहेब सावरलेच नाहीत.

सभापती महोदय, माझ्या जीवनातील एक प्रसंग या ठिकाणी मला सांगावासा वाटतो आहे. सन १९९५ ची विधानसभेची निवडणूक लागली. मी त्यावेळी पुणे येथे शिकण्यास होतो. आडसकर साहेबांचे सर्वात कनिष्ठ चिरंजीव श्री.रमेश आडसकर हे माझ्यासाेबत माझ्या रुमवर रहाण्यासाठी होते. एकीकडे स्व.मुंडे साहेब उमेदवार म्हणून निश्चित झाले होते तर दुसरीकडे कॉंग्रेसकडून बाबाराव आडसकर साहेबांची उमेदवारी निश्चित झाली होती. आडसकर साहेबांच्या घरातील एक आणि मुंडे साहेबांच्या घरातील एक मुलगा एकाच रुमवर रहाण्यासाठी होते. मी
आणि रमेशने मुंडे साहेब आणि आडसकर साहेब, अशा दोघांना फोन करुन शुभेच्छा दिल्या. त्यावेळचे आडसकर साहेबांचे एक वाक्य मला आजही आठवते आहे. ते असे म्हणाले होते की, "राजकारणात कितीही कठोर वागावे लागले तरी मैत्रीत कसल्याही प्रकारची कटुता कधी येऊ द्यायची नाही. " मी ज्यावेळी या पक्षात आलो त्यावेळी रमेशा आडसकर या पक्षात होते. आता ते सत्तारुढ पक्षात आहेत. पण आमच्या मैत्रीत कधी कटुता आली नाही.

सभापती महोदय, वयाच्या ८९ व्या वर्षापर्यंत शेवटच्या कार्यकर्त्याची ओळख असणारा नेता म्हणून आडसकर साहेब आमच्या जिल्ह्यात परिचित होते. त्यांच्या

श्री.धनंजय मुंडे...........

जाण्याने बीड जिल्ह्याचे फार मोठे नुकसान झाले आहे.

सभापती महोदय, या सर्व दिवंगत सन्माननीय सदस्यांना मी मनापासून आदरांजली अर्पण करतो.

धन्यवाद.

या नंतर श्री. खर्चे

या नंतर श्री. खर्चे

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या): सभापती महोदय, कै.केवलचंद कन्हैय्यालाल जैन, माजी वि.प.स. व माजी राज्यमंत्री, कै. बाबुराव नरसिंगराव कोकाटे-आडसकर, कै. आनंदीराम मोदीराम कुमठ, माजी वि.प.स. यांच्या दु:खद निधनाबद्दल मी शिवसेना पक्षाच्या वतीने श्रध्दांजली अर्पण करण्यासाठी उभी आहे.

सभापती महोदय, जवळपास सात दशके या तीन नेत्यांनी ग्रामीण महाराष्ट्रात समाजकारण व राजकारण केले, स्वातंत्र्य लढ्यापासून स्वातंत्र मिळेपर्यंत व स्वातंत्र्य मिळाल्यावर अनेक निवडणुकांमध्ये चढ उतार पाहिलेली ही तीन व्यक्तीमत्वे होती. या कालखंडात त्यांना दीर्घायुष्य मिळाले, त्याचबरोबर ग्रामीण महाराष्ट्राचा चेहरा व ग्रामीण महाराष्ट्राचे नेते म्हणून ज्यांना ओळखता येईल अशा प्रकारचे कार्य या तीनसदस्यांनी वेगवेगळया भागात केले होते.

सभापती महोदय, कै.केवलचंद कन्हैय्यालाल जैन यांचे कार्य गोंदिया व भंडारा या भागात सुपरिचित आहे, ऑक्टोबर १९८२ ते १९८३ या काळात त्यांनी ऊर्जा, वने, सामाजिक वनीकरण, दारुबंदी उत्पादन शुल्क या खात्याचे राज्यमंत्री म्हणून काम केले होते. आपण असे म्हणतो की, राजकारण फक्त मोठ्या शहरांपुरते मर्यादित असते तर ते तसे नाही. मुंबई, पुणे, नागपूर, संभाजीनगर ही मोठी शहरे सोडून ग्रामीण भागात यांनी शैक्षणिक संस्था उभारल्या, कृषी उत्पन्न बाजार समित्यांची कार्ये केली. कै.केवलचंद कन्हैय्यालाल जैन यांनी वेगवेगळया ठिकाणी राजकारणाच्या माध्यमातून समाजसेवा केली. त्यांना मी श्रध्दांजली अर्पण करते.

सभापती महोदय, कै.बाबुराव नरसिंगराव कोकाटे-आडसकर यांचा बीड जिल्ह्यात वेगळ्या प्रकारे दरारा होता. बीड जिल्ह्यात राजकीय चमत्कार घडविणारे अनेक सर्वेसर्व होते, त्यामध्ये कै.आडसकर यांचे कार्य वेगळ्या प्रकारचे होते.ग्रामीण भागातील जनतेवर त्यांची चांगली पकड होती. उस्मानाबाद-लातूर-बीड या परिसरातून ते विधानपरिषदेवर सन १९८७ मध्ये निर्वाचित झाले व त्यांनी त्या भागात कार्य केले होते. त्यांना श्रध्दांजली अर्पण करीत असताना मी

डॉ.नीलम गोऱ्हे .....

असे सांगू इच्छिते की, त्यांचा व माझा खूप काही संबंध नसला तरी बैठका व काही कार्यक्रमांमध्ये त्यांचा व माझा परिचय झाला होता. ते लोकांच्या भेटी कशा प्रकारे घेतात, लोकांचे प्रश्न कशा प्रकारे सोडवितात, याबाबत माहिती घेण्याची उत्सुकता असते, त्यामध्ये संघर्ष सुध्दा होऊ शकतो. याची मला चांगली कल्पना आहे. या पार्श्वभूमीवर बीड मध्ये त्यांनी त्यांच्या कामाचा ठसा उमटविला होता. बीड जिल्ह्यांचे नेतृत्व म्हणून अनेक लोकांना ते चिरपरिचित व चिरस्मरणीय होते. सातत्याने लोकांवर त्यांचा प्रभाव जाणवेल अशा प्रकारच्या अनेक संस्था त्यांनी उभारल्या आहेत. कै.बाबुराव नरसिंगराव कोकाटे-आडसकर यांना मी श्रध्दांजली अर्पण करते.

सभापती महोदय, कै.आनंदीराम मोदीराम कुमठ यांचे शिक्षण डिप्लोमा इन इंजिनिअरिंग पर्यन्त झाले होते. समाजातील वेगवेगळ्या घटकांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या व्यक्ती राजकारणात असाव्यात असा प्रयत्न जनतेचा असतो. कै.कुमठ हे महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे सदस्य, काँग्रेस सेवादलाच्या महाराष्ट्र शाखेचे प्रमुख, जैन महामंडळाचे अध्यक्ष होते, ते सन १९६८ मध्ये महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा विधानपरिषदेवर निर्वाचित झाले होते. १९७५ नंतर सभागृहात ते निवडून आले नाहीत तरी आपण बऱ्याच वेळा माजी आमदारांच्या संदर्भात चर्चा करतो. त्यांचे प्रश्न काय आहेत, त्याबाबत कशा पध्दतीने विचारविनिमय होऊ शकतो, त्यांचा वेगवेगळ्या कामात कसा सहभाग असतो, याबाबत मला असे वाटते की, माजी आमदारांनी जे कार्य केले, अशा निवृत्त झालेल्या सन्माननीय सदस्यांचा व विद्यमान सन्माननीय सदस्यांचा आपल्या राजकीय पक्षांच्या व्यासपीठा व्यतिरिक्त काही ठिकाणी चर्चा, विचारविनियम, अनुभव कथन असे कार्यक्रम राबविले तर आमच्या सारख्या सदस्यांना त्यांचा फायदा होईल. मी सन २००२ पासून सभागृहाची सदस्य आहे, अनेक सभासद निवृत्त झाले आहेत, त्यांचा परिचय त्या जिल्ह्यात गेल्यावरच होतो, या दृष्टीने विचारविनिमय करण्याची

डॉ.नीलम गोऱ्हे......

गरज भासते ज्यांची कारकीर्द संपली, जे सदस्य निवृत्त झाले, त्यांना काम करण्याची इच्छा असते, त्या दृष्टीकोनातून त्यांच्याशी सातत्त्याने अधिक संवाद कसा ठेवता येईल, हे श्रध्दांजलीच्या वेळी व्यक्त करण्यात कोणताही औचित्य भंग न होता आपण अधिकाअधिक आपली कार्यपध्दती सुधारीत आहोत, त्या पार्श्वभूमीवर हा विषय मांडणे मला औचित्यपूर्ण वाटतो. या तीन सन्माननीय सदस्यांना मी शिवसेना पक्षाच्या वतीने श्रध्दांजली अर्पण करते.

--------

श्री.शरद रणपिसे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सभागृहाचे सन्माननीय नेते यांनी कै.केवलचंद कन्हैय्यालाल जैन, माजी वि.प.स. व माजी राज्यमंत्री, कै. बाबुराव नरसिंगराव कोकाटे-आडसकर, कै.आनंदीराम मोदीराम कुमठ, माजी वि.प.स. यांच्या दु:खद निधनाबद्दल शोक प्रस्ताव मांडला आहे, मी काँग्रेस पक्षाच्या वतीने तीव्र दु:ख व्यक्त करतो व श्रध्दांजली अर्पण करतो.

सभापती महोदय, या तीन सन्माननीय सदस्यांपैकी कै. आनंदीराम कुमठ यांचा व माझा जास्त संबंध आलेला नाही. कै.केवलचंद जैन व कै.बाबुराव आडसकर यांच्या बरोबर काम करण्याची संधी मला लहानपणी मिळाली होती. त्यांचा व माझा फार जवळचा संबंध होता. कै.केवलचंद जैन हे गोंदियाचे होते. एक सच्चे गांधीवादी नेते असा त्यांचा आजपर्यंतचा प्रवास आहे. ते स्वातंत्र्य सैनिक होते. भंडारा-गोंदिया आणि वर्धा जिल्ह्यातील काही कुटुंबे महात्मा गांधी व विनोबा भावे यांच्याशी संबंधित होती, त्यामध्ये जमनालाल बजाज व कै.केवलचंद जैन यांचे कुटुंब महात्मा गांधी व विनोबा भावे यांच्याशी संबंधित होते. त्यांच्या बरोबर विधिमंडळात काम करण्याची संधी मला मिळाली होती. त्यावेळी ते विधानपरिषदेत सदस्य होते व मी विधानसभेत सदस्य होतो. काँग्रेस पक्षाचे थिंक टँक म्हणून कै.केवलचंद जैन यांच्याकडे पाहिले जात होते. मला आठवते की, विधिमंडळाचे अधिवेशन असले की, कै.केवलचंद जैन, डॉ. श्रीकांत जिचकर व श्री.अविनाशजी पांडे या तिघांची अतिशय चांगली मैत्री होती. विधिमंडळाचे अधिवेशन सुरु असताना रोज दुपारी डॉ.श्रीकांत जिचकर यांच्या कार्यालयात हे तिघे बसत होते, त्यावेळी विदर्भातील काही नेते त्यांच्या सोबत कार्यालयात बसत होते. त्यावेळी त्यांच्या बरोबर राजकारणातील गप्पा मारण्यात व राजकीय पक्षाची भूमिका ठरविण्यात मला त्यांचा सहभाग लाभला होता. कै.केवलचंद जैन तत्ववादी जीवन जगले, एखाद्या व्यक्तीने आपल्या आयुष्यात काही तत्वे पाळावीत इंग्रजीत त्याला "Man of the principle" म्हणतो. कै.केवलचंद जैन हे "Man of the principle" अशा पध्दतीने गांधी वादावर जगले त्यांना मी भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो.

श्री.शरद रणपिसे......

सभापती महोदय, कै.बाबुराव नरसिंगराव कोकाटे-आडसकर हे नाव उच्चारल्या बरोबर प्रचंड व्यक्तीमत्व असलेली आकृती आपल्यासमोर उभी राहते. हे व्यक्तीमत्व भर भक्कम, धिप्पाड, गांधी टोपी डोक्यावर आणि अंगात जॅकेट असे होते. मला सांगण्यास आनंद वाटतो की, स्वातंत्र्य प्राप्तीनंतर कै.यशवंतराव चव्हाण, कै.वसंतराव नाईक आणि कै.वसंतदादा पाटील यांनी महाराष्ट्रातील जिल्ह्या-जिल्ह्यात जे नेतृत्व तयार केले त्यामध्ये बीड जिल्ह्यातील चार महत्वाच्या नेत्यांचा मी उल्लेख करतो. यातील शेवटचे नेते कै.बाबुराव आडसकर निखळले आहेत, असे म्हटले तर वावगे होणार नाही. सन १९६० ते ७० च्या कालखंडात कै.सुंदरराव सोळंके होते, त्यानंतर आदरणीय केशरकाकू शिरसागर होत्या. सयाजीराव पंडित खासदार होते, कै. बाबूराव आडसकर होते, बाबुराव आडसकर या पिढीतील शेवटचे होते. या चौघांच्या नेतृत्वाखाली बीड जिल्ह्यातील काँग्रेस पक्ष एकसंध व मजबूत होता. हे सर्व जमविण्याचे श्रेय कै.बाबूराव आडसकर यांना दिले पाहिजे. त्याचा स्वभाव अतिशय मिश्कील होता, हा माणूस अतिशय सच्चा व काँग्रेस पक्षाचा पक्का सैनिक होता. अशा पध्दतीने कै.बाबुराव आडसकर जीवन जगले. मी त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो.

या नंतर श्री. बोरले

श्री.शरद रणपिसे.......

सभापती महोदय, कै.आनंदीराम कुमठ यांचा जन्म जळगाव जिल्ह्यातील गुजर पिंपळे येथे झाला होता. माझा त्यांच्याशी फारसा संबंध आलेला नाही. परंतु, त्यांचे चरित्र वाचल्यानंतर त्यांचे योगदान अतिशय महत्वाचे असल्याचे दिसून येते. आपण सर्व काँग्रेस पक्षात एकत्र काम करीत आहोत. परंतु, आता कै.केवलचंद जैन, कै.बाबुराव कोकाटे-आडसकर यांच्या सारखे जुन्या पिढीतील एक-एक नेते कमी होत आहेत आणि आपल्या दोन्ही पक्षाच्या दृष्टीने ही गोष्ट चांगली नाही. त्यांचे अनुकरण करणे, त्यांचे विचार पुढे नेणे हीच आपल्या दोन्ही पक्षाच्या वतीने त्यांना खरी श्रद्धाजली ठरेल.

सभापती महोदय, मी दिवंगत माजी सन्माननीय सदस्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करुन माझे दोन शब्द पूर्ण करतो.

---------

श्री.गिरीश बापट (संसदीय कार्यमंत्री) : सभापती महोदय, सभागृहाच्या नेत्यांनी दिवंगत माजी सन्माननीय सदस्यांच्या दु:खद निधनाबद्दल जो शोक प्रस्ताव मांडलेला आहे त्या प्रस्तावाला अनुमोदन देण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, कै.केवलचंद जैन आणि कै.आनंदीराम कुमठ यांचा आणि माझा फारसा परिचय नव्हता. परंतु, मला कै.बाबुराव कोकाटे-आडसकर यांचा उल्लेख केला पाहिजे. त्यांचा आणि माझा व्यक्तिगत संबंध होता. त्यांचे चिरंजीव श्री.रमेश आडसकर यांच्या बरोबर मी अनेक वेळा त्यांच्या घरी गेलो होतो. राज्यात ६ महिन्यांपूर्वी दुष्काळी परिस्थिती असताना मी त्या भागात दौऱ्यावर गेलो होतो. त्यावेळी मी त्यांच्या घरी जाऊन आलो. मला त्यांच्या बरोबर काम करताना एक गोष्ट जाणवली की, आपण सर्व विविध राजकीय पक्षात काम करतो. परंतु, कै.बाबुराव आडसकर याचे व्यक्तिमत्व असे होते की, ते वयाने आणि ज्येष्ठतेने मोठे होतेच, परंतु त्यांचे मन देखील मोठे होते. आज काल राजकीय जीवनात एकमेकांच्या विरोधरात, आपली विचारसरणी वेगळी असू द्यावी, परंतु व्यक्तिगत पातळीवर राजकारण केले जाते. कै.आडसकर हे सर्व पक्षाच्या लोकांना एकत्र घेऊन, सर्वांबरोबर चांगले संबंध ठेऊन काम करणारे वडिलधारी नेतृत्व होते. त्यांच्या निधनामुळे मोठी पोकळी निर्माण झालेली आहे. आपण सर्व त्यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेऊन काम करण्याचा प्रयत्न करु.

सभापती महोदय, मी दिवंगत माजी सन्माननीय सदस्यांना आदरांजली वाहून माझे दोन शब्द पूर्ण करतो.

------------

श्री.अमरसिंह पंडित (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सभागृहाच्या नेत्यांनी कै.केवलचंद जैन, कै.बाबुराव कोकाटे-आडसकर, कै.आनंदीराम कुमठ, माजी वि.प.स. यांच्या दु:खद निधनाबद्दल जो शोक प्रस्ताव मांडलेला आहे त्यावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, कै.बाबुराव कोकाटे-आडसकर यांचा जन्म बीड जिल्ह्यातील केज तालुक्यातील मौजे आडस येथे झाला होता. मला त्यांच्या बरोबर काम करण्याची संधी मिळाली. त्यांना वजा, बाकी, बेरीज, हिशोब कधी जमलाच नाही. माझ्या तालुक्यातील एवढी गावे दुष्काळग्रस्त आहेत, अमूक गावात नळ योजनांची कामे सुरु आहेत, जिल्ह्यातील मजुरांची संख्या इतकी आहे अशी वजा, बाकी, बेरीज त्यांना कधी जमली नाही. कै.आडसकर साहेब एकटे दौऱ्यावर जात असत आणि ते सायंकाळी तहसीलदार किंवा उप जिल्हाधिकाऱ्यांना फोन करुन सांगायचे की, तुम्ही इतक्या गावांची नोंद करुन घ्यावी. मी जे सांगितले ते तुम्ही बरोबर ऐकले काय ? मला पुन्हा एकदा सांगावे, असे ते अधिकाऱ्यांना वडिलकीच्या भावानेने सांगत असत. त्यांचे वयाच्या ९० व्या वर्षी दु:खद निधन झाले. बीड जिल्ह्यातील जनता त्यांच्याकडे काळजी करणारा नेता म्हणून बघत होती. आम्ही त्यांना तात्या म्हणत होतो. बीड जिल्ह्यात त्यांचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते.

सभापती महोदय, कै.केशर काकू, कै.सुंदरराव साहेब आणि कै.आडसकर साहेब हे सर्व पहिल्या फळीतील नेते होते. त्यानंतर कै.मुंडे साहेब आले. कै.मुंडे साहेब देखील कै.आडसकर, कै.सुंदरराव साहेबांशी आदराने बोलत होते. मला आठवते की, ज्यावेळी कै.केशर काकू श्री.क्षिरसागर यांच्या घरी गेल्या त्यावेळी कै.मुंडे साहेब त्यांच्याशी तेवढ्याच आदराने किंवा त्यापेक्षाही जास्त आदराने बोलत होते. हे सर्व बीड जिल्ह्यातील पहिल्या फळीतील नेते होते. त्यांना बीड जिल्ह्यातील केवळ राजकारणाची नाही तर समाजकारणाची देखील खडानखडा माहिती होती. मी तालुका पंचायत समितीचा सभापती असताना मला डीपीडीसीच्या एका बैठकीला उपस्थित राहण्याची संधी मिळाली होती. त्यावेळी मी बघितले की, कै. आडसकर

श्री.अमरसिंह पंडित .....

साहेबांकडे मतदारसंघातील रस्ते, पिण्याच्या पाण्याचे प्रश्न, शाळा खोली किंवा गावातील एखाद्या विशिष्ट योजनेबाबत संपूर्ण माहिती होती. आम्हाला सभागृहात एखाद्या विषयावर बोलावयाचे असेल तर आम्हाला त्या विषयाच्या सर्व मुद्यांची नोंद घेऊन, तो विषय दोन वेळा वाचून सभागृहात यावे लागते. परंतु, त्यावेळी या लोकांचा जनतेबरोबर एवढा राबता होता की, मतदारसंघातील लोकांच्या अडचणी त्यांच्या तोंड पाठ होत असत. त्यामुळे डीपीडीसीच्या बैठकीत किंवा सभागृहात अचूक मांडणी केली जायची आणि वास्तव मांडले जायचे. दुर्दैवाने अलीकडच्या काळात काही प्रमाणात अतिश्योक्ती होत असेल तर नवल वाटण्याचे काही कारण नाही.

सभापती महोदय, कै.आडसकर साहेबांनी बापूसाहेब काळदाते यांना निवडणुकीत पराभूत केल्यानंतर त्यांनी पहिल्या भाषणात त्याबाबत उल्लेख केला होता. मघाशी माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सांगितले की, मी आज एका मोठ्या नेत्याला 'हाबाळा' दिला. 'हाबाळा' हा शब्द आमच्या बीड जिल्ह्याच्या राजकारणातून आलेला आहे. ज्यावेळी त्यांनी बापूसाहेब काळदाते यांना पराभूत केले त्यावेळी लोक आश्चर्यचकीत झाले की, एवढ्या मोठ्या नेत्याला पराभूत करणारा माणूस कोण आहे ? कै.आडसकर साहेबांकडे रांगडा नेता म्हणूनही बघितले जात होते.

सभापती महोदय, कै.आडसकर साहेब बराच काळ राज्य सहकारी बँकेचे संचालक होते. मध्यंतरी बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे कर्ज वसुलीचे प्रमाण वर-खाली झाले किंवा काही अडचणी आल्या होत्या. आता साखरेच्या हंगामात थोडी वसुली होईल. त्यासाठी थोडे दिवस थांबावे लागेल. मी सांगू इच्छितो की, शेतकऱ्यांना पीक कर्जाचे वाटप करण्यासाठी निधी लागत होता. परंतु, कै.आडसकर साहेबांनी फोन करुन ५० कोटी रुपये पाठवून द्यावे असे सांगितल्यानंतर जिल्हा बँकेकडे ५० कोटी रुपये पाठविले जात होते. हीच परिस्थिती आहे, या पलीकडे काही नव्हते. ते अधिकारवाणीने बोलत होते. त्यांच्या बोलण्यात एक प्रकारची धार

श्री.अमरसिंह पंडित .....

होती. मघाशी माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सांगितले की, त्यांचे दुसऱ्या क्रमांकाचे चिरंजीव श्री.मेघराज यांचे काही दिवसांपूर्वीच निधन झाले. त्यांचे मोठे चिरंजीव श्री.प्रकाश यांचे प्रथम निधन झाले व त्यानंतर श्री.मेघराज यांचे निघन झाले. त्यांच्यावर आपल्या दोन्ही मुलांच्या अंत्यसंस्काराला उपस्थित राहण्याची वेळ आली. ते शेवट पर्यंत त्यातून सावरु शकले नाहीत. मला असे वाटते की, कै.मेघराज यांचे चौदावे व्हायचे हाते तर दुसऱ्या मुलाचे कार्य पूर्ण व्हायचे बाकी होते. परंतु, त्या अगोदरच कै.आडसकर साहेबांचे निधन झाले. त्यांना हे सर्व सहन न झाल्यामुळे त्यांचे निधन झाले. कै.आडसकर साहेबांना सिरियस आर्थरायटीसचा प्रॉब्लेम असताना सुद्धा त्यांची ग्रामीण भागाशी असलेली नाळ तुटली नाही. त्यांना भेटायला गेल्या नंतर ते बीड जिल्ह्यातील संपूर्ण माहिती खडानखडा सांगत असत. मी त्यांना याचे कारण विचारले असता त्यांनी मला सांगितले की, तुमच्या मतदारसंघातील जनतेशी जास्त भेटीगाठी होत नाहीत. मी पत्रमानपत्रातून, लोकांची भेट घेऊन आणि दिवसातून किंमान शंभर लोकांना फोन करुन आपल्या भागात कापूस व सोयाबीन पिकाचा किती पेरा आहे, पिकांची काय परिस्थिती आहे याबाबत माहिती घेतो. मी चार-पाच महिन्यांपूर्वी दुष्काळी भागात गेलो होतो त्यावेळी माझ्याकडे नसलेली माहिती त्यांनी मला सांगितली. वर्तमानपत्रात बातमी छापून आली होती की, तुमच्या भागात एवढा कापसाचा पेरा आहे. तुमच्या भागात सर्वाधिक दुष्काळ आहे, कापूस पिकाच्या क्षेत्राची राखरांगोळी झालेली आहे, असे त्यांनी मला सांगितले. अशा एका जाणकार नेत्याला आज बीड जिल्ह्यातील जनता मुकलेली आहे. त्यांचे निघन झाल्यानंतर मोठ्या प्रमाणावर लोक गोळा झाले आणि त्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. कै.आडसकर साहेबांचे व्यक्तिमत्व आम्ही अजूनही विसरु शकलो नाही. कारण त्यांच्याकडून खूप काही शिकण्यासारखे होते. मला असे वाटते की, जुन्या लोकांच्या काम करण्याच्या ज्या पद्धती होत्या त्या आमच्या सारख्या नवीन लोकांनी आत्मसात करण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

श्री.अमरसिंह पंडित .....

सभापती महोदय, मी कै.बाबुराव आडसकर, श्री.केवलचंद जैन आणि कै.आनंदीराम कुमठ यांना श्रद्धांजली वाहतो आणि माझे दोन शब्द पूर्ण करतो.

-----------

या नंतर श्री. भोगले

श्री.जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सभागृह नेत्यांनी कै.केवलचंद जैन, माजी वि.प.स. व माजी राज्यमंत्री, सर्वश्री बाबुराव नरसिंगराव कोकाटे-आडसकर, आनंदीराम मोदीराम कुमठ, माजी वि.प.स.यांच्या दु:खद निधनाबद्दल मांडलेल्या शोकप्रस्तावाला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, कै.बाबुराव आडसकर यांच्याशी माझा संबंध आलेला होता. आंबेजोगाई येथे शेतकरी कामगार पक्षाचे अधिवेशन झाले होते. त्या अधिवेशनाचे त्यांनी नेतृत्व केले होते. मी त्या अधिवेशनाला वयाच्या आठव्या वर्षी हजर राहिलो होतो. ते अधिवेशन खूप गाजले. शेतकरी कामगार पक्षाचे बरेचसे कार्यकर्ते यशवंतराव चव्हाणांच्या बेरजेच्या राजकारणासाठी त्यावेळी कॉंग्रेस पक्षामध्ये गेले. कै.बाबुराव आडसकर हे त्यांच्या मिशा, ध्येययष्टी, अंगावरील जाकिट यामुळे वेगळया प्रकारचे व्यक्तिमत्व होते. प्रत्येक वेळी मिशीला पीळ देऊनच ते समोरच्या व्यक्तीशी बोलायचे. ग्रामीण बोली भाषेतून बोलणारा नेता म्हणजे बाबुराव आडसकर हे समीकरण ठरलेले होते. मराठवाड्यातील ग्रामीण भाषेतून बोलणारा हा सर्वसामान्य जनतेचा नेता होता.

सन १९७२ व १९७८ मध्ये ते विधानसभेवर निवडून गेले होते. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी म्हटल्याप्रमाणे दहा वर्षाच्या खंडानंतर १९८७ साली ते विधानपरिषदेवर निवडून आले होते. त्या वेळेला माझे काका विरोधी पक्षनेता होते. कै.बाबुराव आडसकर यांनी विधिमंडळाशी १० वर्षाच्या काळात आपुलकीचे संबंध निर्माण केले होते. त्यांची विधानपरिषदेवर निवड झाली तेव्हा विधिमंडळाचा कर्मचारीवर्ग त्यांच्या स्वागतासाठी गेलेला होता. मी त्यावेळी माझ्या काकांबरोबर तेथे उपस्थित होतो. त्यांनी त्यांच्या २०० ते ३०० कार्यकर्त्यांसह विधिमंडळ इमारतीभोवती फेऱ्या मारल्या. त्यांची ती विधानपरिषद निवडणूक फार गाजली होती. त्याची चर्चा अनेक दिवस वृत्तपत्रातून सुरु होती.

कै.बाबुराव आडसकर यांच्याबरोबर महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेत काम

श्री.जयंत प्र.पाटील......

करण्याची मला संधी मिळाली होती. भाऊसाहेब थोरात ज्या पध्दतीने राज्य सहकारी बँकेमध्ये खालच्या स्तरावरील प्रश्न मांडायचे, त्याच पध्दतीने राज्य सहकारी बँकेमध्ये आपली भूमिका मांडण्याचे काम बाबुराव आडसकर यांनी केले होते. त्या काळात राज्य सहकारी बँकेतील संपूर्ण राजकारण कुलाब्यातील गेस्ट हाऊसमध्ये बसून केले जायचे, डावपेच आखले जायचे. तू हे मांडले पाहिजे आणि अडवले पाहिजे असा आग्रह ते मला करायचे. ग्रामीण भागातील सर्वसामान्य लोकांची नाडी ओळखणारा नेता म्हणून त्यांची मराठवाड्यामध्ये ओळख होती. मी माझ्या पक्षाच्या वतीने आणि माझ्या कुटुंबीयांच्या वतीने या तीनही दिवंगत नेत्यांना श्रध्दांजली वाहतो आणि माझे बोलणे पूर्ण करतो.

----------------

**सभापती** : सभागृहाचे नेते श्री.चंद्रकांतदादा पाटील यांनी केवलचंद कन्हैय्यालाल जैन, माजी वि.प.स. व माजी राज्यमंत्री, सर्वश्री बाबुराव नरसिंगराव कोकाटे-आडसकर, आनंदीराम मोदीराम कुमठ, माजी वि.प.स. यांच्या दु:खद निधनाबद्दल शोकप्रस्ताव मांडला आहे. त्यावर सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.धनंजय मुंडे, सन्माननीय सर्व गटनेते, सन्माननीय संसदीय कार्यमंत्री श्री.गिरीश बापट यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत.

कै.केवलचंद जैन यांनी स्वातंत्र्य संग्रामात सक्रिय सहभाग घेतला होता. त्यात त्यांना कारावासही झाला होता. कै.केवलचंद जैन यांनी गोंदिया शिक्षण संस्थेचे अध्यक्ष म्हणून उत्तम कार्य केले. भंडारा व गोंदिया जिल्हयातील अनेक शैक्षणिक, सामाजिक व सहकारी संस्थांशी त्यांचा निकटचा संबंध होता. भंडारा, गोंदिया जिल्हयातील आदिवासींच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी विशेष योगदान दिले होते. कै.केवलचंद जैन सन १९८० मध्ये भंडारा स्थानिक प्राधिकारी संस्था मतदारसंघातून महाराष्ट्र विधानपरिषदेवर निर्वाचित झाले होते. ऑक्टोबर, १९८२ ते फेब्रुवारी, १९८३ या काळात नियोजन, दारुबंदी व उत्पादन शुल्क, ऊर्जा व वने, सामाजिक वनीकरण व संसदीय कार्य खात्याचे राज्यमंत्री म्हणून त्यांनी उत्तम कार्य केले होते. त्यांचे दिनांक २ ऑक्टोबर, २०१६ रोजी दु:खद निधन झाले.

कै.बाबुराव नरसिंगराव कोकाटे-आडसकर यांनी छत्रपती शिक्षण संस्थेचे संस्थापक, मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष, आंबा सहकारी साखर कारखान्याचे संस्थापक चेअरमन, बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे संचालक, केज तालुका पंचायत समितीचे सभापती तसेच बीड जिल्हा परिषद सदस्य म्हणून त्यांनी उत्तम कार्य केले होते. बीड जिल्हयातील अनेक शैक्षणिक, सामाजिक व सहकारी संस्थांशी त्यांचा निकटचा संबंध होता. कै.बाबुराव कोकाटे-आडसकर सन १९७२ व १९७८ मध्ये दोन वेळा महाराष्ट्र विधानसभेवर निर्वाचित झाले होते.

**सभापती.....**

सन १९८७ मध्ये ऊस्मानाबाद-लातूर-बीड स्थानिक प्राधिकारी मतदारसंघातून महाराष्ट्र विधानपरिषदेवर निर्वाचित झाले होते. त्यांचे दिनांक १२ ऑगस्ट, २०१६ रोजी दु:खद निधन झाले आहे.

कै.आनंदीराम मोदीराम कुमठ यांनी धरणगाव शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष, धुळे चेंबर ऑफ कॉमर्सचे सदस्य, धुळे जिल्हा औद्योगिक सहकारी संस्थेचे अध्यक्ष तसेच त्यांनी काँग्रेस सेवादलाचे महाराष्ट्र शाखेचे प्रमुख म्हणूनही उत्तम कार्य केले होते. धुळे जिल्हयातील अनेक सामाजिक, शैक्षणिक व सहकारी संस्थांशी त्यांचा निकटचा संबंध होता. कै.आनंदीराम कुमठ १९६८ मध्ये विधानसभा सदस्यांद्वारा महाराष्ट्र विधापरिषदेवर निर्वाचित झाले होते. त्यांचे दिनांक ३० सप्टेंबर, २०१६ रोजी दु:खद निधन झाले. सर्व दिवंगतांच्या स्मृतीस मी अभिवादन करतो, भावपूर्ण आदरांजली वाहतो.

माननीय सदस्यांनी दोन मिनिटे उभे राहून शोक प्रस्ताव संमत करावा, अशी माझी त्यांना विनंती आहे.

(सदस्य उभे राहतात)

सदस्यांनी खाली बसावे.

शोक प्रस्ताव संमत करण्यात आला आहे. प्रस्तावाची एक प्रत शोकाकूल कुटुंबियांकडे पाठविण्यात येईल.

--------------

**पृ.शी./मु.शी.** : देशाच्या सीमेवर शत्रुराष्ट्राच्या
व दहशतवाद्यांच्या हल्ल्यात वीरमरण
प्राप्त झालेल्या जवानांना
श्रध्दांजली अर्पण करणे

श्री.धनंजय मुंडे (विरोधी पक्षनेता) : सभापती महोदय, मी महाराष्ट्र विधानपरिषद नियम १४ अन्वये या सदनामध्ये आपल्या अनुमतीने पुढील प्रस्ताव मांडतो.

मागील काही महिन्यात देशाच्या सीमेवर शत्रुराष्ट्राकडून वारंवार हल्ले होत आहेत. दहशतवाद्यांकडून सीमेवर घ◌ा◌ुसखोरीच्या कारवायाही सुरु आहेत.

नोव्हेंबर महिन्यात झालेल्या सर्जिकल स्ट्राईकनंतरही ५६ हून अधिक हल्ले झाले आहेत.

या विविध हल्ल्यात महाराष्ट्रातील सांगलीचा नितीन सुभाष कोळी, कोल्हापूर जिल्हयातील नायक राजेंद्र तुपारे, पंढरपूरचा मेजर कुणाल गोसावी, नांदेड जिल्हयातील लान्सनायक संभाजी कदम, यवतमाळचे विकास कुलमेथे, लान्सनायक चंद्रकांत गलांडे, नाशिकचे संदीप ठोक, अमरावतीचे पंजाब जानराव उईके या व इतर जवानांना वीरमरण प्राप्त झाले.

देशासाठी अभिमानास्पद शौर्याचे काम करणाऱ्या या वीर जवानांनाही श्रध्दांजली वाहावी अशी आम्ही या प्रस्तावाद्वारे सभागृहाला विनंती करीत आहोत.

**सभापती :** माननीय सदस्यांनी दोन मिनिटे उभे राहून वीरमरण प्राप्त झालेल्या जवानांना श्रध्दांजली अर्पण करावी, अशी माझी त्यांना विनंती आहे.

(सदस्य उभे राहतात)

सदस्यांनी खाली बसावे.

या नंतर श्री. ओटवणेकर

**सभापती........**

सदनाच्या भावना वीर मरण आलेल्या जवानांच्या कुटुंबियांना कळविण्यात याव्यात.

...........

**सभापती :** आपल्या सदनातील सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते हे आज निवृत्त होत आहेत. त्यांचा आजचा शेवटचा दिवस आहे. सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते हे विधान परिषद आश्वासन समितीचे समितीप्रमुख आहेत. एक अपवाद म्हणून मी त्यांना त्यांच्या समितीचा १९३ वा अहवाल मांडण्यास अनुमती देत आहे. त्यांनी तो अहवाल मांडावा.

**पृ.शी./मु.शी. :** विधान परिषद आश्वासन समितीचा १९३ वा अहवाल सादर करणे

श्री.रामनाथ मोते (समिती प्रमुख) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विधान परिषद आश्वासन समितीचा १९३ वा अहवाल सभागृहाला सादर करतो.

**सभापती :** विधान परिषद आश्वासन समितीचा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

.........

**पृ.शी./मु.शी. :** सभापती तालिका नामनिर्देशित करणे.

**सभापती :** मी महाराष्ट्र विधान परिषद नियमातील नियम ८ (१) अन्वये खालील सभासदांना सभापती तालिकेवर नामनिर्देशित करतो :-

श्री.ख्वाजा बेग
आर्कि.अनंत गाडगीळ
प्रा.अनिल सोले
डॉ.नीलम गोऱ्हे.

आता सभागृहाची बैठक स्थगित होत असून उद्या मंगळवार, दिनांक ६ डिसेंबर २०१६ रोजी दुपारी १२.०० वाजता पुन: भरेल.

(सभागृहाची बैठक दुपारी १ वाजून ५१ मिनिटांनी, मंगळवार, दिनांक ६ डिसेंबर २०१६ रोजीच्या दुपारी १२.०० वाजेपर्यंत स्थगित झाली.).

.........